रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १८६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पोलादपूर तालुक्याला रोजगाराची गरज/४
जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती/६
जमीन मोजणीदरम्यान कर्मचाऱ्यावर हल्ला/७

## रायगडमध्ये मंत्री गोगावलेंना ध्वजारोहणाचा मान

**मुंबई :** २६ जानेवारीला देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन साजरा केला जाणार आहे. या दिनानिमित्त



कोणते मंत्री कोणत्या जिल्ह्याच्या ठिकाणी ध्वजारोहण करणार याबाबतची माहिती शासनाच्या वतीने देण्यात आली आहे. सरकार एक परित्रक जाहीर केलं आहे. यामध्ये कोणत्या जिल्ह्यात कोणता मंत्री ध्वजारोहण करणार याची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार रायगड मुख्यालयातील ध्वजारोहणाचा मान मंत्री भरत गोगावले यांना मिळाला आहे. रायगडचे पालक मंत्री पद स्थगित झाल्यापासून रायगडचे मुख्यालय असलेल्या अलिबागमधील शासकिय ध्वजारोहणावरून शिवसेना राष्ट्रवादीमध्ये रस्सीखेच सुरू होती. गतवर्षी प्रजासत्ताक आणि स्वातंत्र दिनी राष्ट्रवादीच्या मंत्री आदिती तटकरे यांना रायगडच्या मुख्यालयाचे ध्वजारोहण करण्याचा मान देण्यात आला होता.

# रायगडात ग्रोथ सेंटरची होणार निर्मिती

## तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची मुख्यमंत्र्यांकडून घोषणा

**दावोस : वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा केली. नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्या मिळाल्यानंतर तिसऱ्या मुंबईतल्या पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत आहे, अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं

स्वित्झर्लंडमध्ये जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्यासाठीचा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री या वेळी म्हणाले. दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी अनेक सामंजस्य करार केले. यात युनिव्हर्सिटी ऑफ कॅलीफोर्निया,



युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह-लंडन, आयसीसीआय-इटली, ॲलाँग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वे जीयन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुराँग यांच्यासोबतच्या करारांचा समावेश आहे.

नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. त्याबाबत दावोसमध्ये घोषणा करण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळविण्यात येत होत्या. त्या मिळाल्यानंतर आज या तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

याठिकाणी प्लग अँण्ड प्ले या धर्तीवर रेडी टू स्टार्ट पद्धतीने संबंधित घटक लगेच कामकाज सुरु करु शकणार आहेत. ही देशातील पहिली कंपनी, यामध्ये खासगी-सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) प्रकल्प असणार आहे. यात शासन, एमएमआरडीए आणि खासगी घटक एकत्र येऊन काम करतील. याठिकाणी नवीन बिझनेस डीस्ट्रिक्ट तयार करण्यात येत आहे. याठिकाणी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या तसेच ग्लोबल कॅपिसीटी सेंटर्स, फिनटेकची इकोसिस्टम तयार होईल. बीकेसीच्या धर्तीवर याठिकाणी बिझनेस डिस्ट्रीक्ट स्थापन होईल. या शहराच्या घोषणेनंतर सुमारे एक लाख कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करारदेखील झाले आहेत.

दरम्यान, दावोसमध्ये साकारण्यात आलेले मॅग्नेटिक महाराष्ट्राचे पॅव्हेलियन आकर्षणाचे केंद्र राहिल्याचे चित्र होते. या पॅव्हेलियनला विविध क्षेत्रातील उद्योजक, गुंतवणूकदारांसह, भारतातील मान्यवरांनी आवर्जून भेट दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

## पनवेल महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर सकारात्मक तोडगा

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली युनियनला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतील विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगार व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त (मु.) कैलास गावडे यांच्याशी म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, सल्लागार नगरसेवक नितीन पाटील, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव तसेच कोषाध्यक्ष दत्तात्रय म्हात्रे सातत्याने चर्चा करत आहेत. मंगळवारी (दि.२०) सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा होऊन निर्णयांची



अंमलबजावणी करण्याबाबत पालिकेच्या वतीने लेखी प्रतिपादन देण्यात आले आहे.

बैठकीतील पुढील प्रमुख निर्णय कंत्राटदारांकडून न मिळणारी सेवा उपदानाची रक्कम पालिकेच्या स्वतंत्र खात्यात जमा करून कामगारांना अदा करण्यात येईल. सर्व कामगार कर्मचाऱ्यांना दरवर्षी २१ भरपगारी रजा देण्यात येईल. कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी वैद्यकीय योजनेची पूर्तता केली जाईल. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनतूट व अडचणी सोडविण्यासाठी मार्ग काढण्यात येणार. ठेकेदाराद्वारे १०८ कामगारांना ठराविक रक्कम व रजा राखीव कर्मचाऱ्यांना देण्यात येईल. सर्व कामगार व कर्मचाऱ्यांना वेतन स्लिप, फॉर्म १६ व सुरक्षा साधने त्वरीत उपलब्ध करून देण्यात येतील. या निर्णयांमुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून लवकरच कामगारांचा आनंद मेळावा घेण्यात येईल, अशी माहिती म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे कार्यालय प्रमुख महेंद्र गायकवाड यांनी दिली.

### रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक

# भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल; मान्यवरांची उपस्थिती



**पनवेलमधील जिल्हा परिषदेचे गट**

वावंजे, नेरे, पाली देवद, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे

**पंचायत समितीचे गण**

वावंजे, चिंध्रण, नेरे, आदई, पालीदेवद, विचुंबे, पळस्पे, कोन, पोयंजे, वावेघर, करंजाडे, वडघर, वहाळ, गव्हाण, केळवणे, आपटा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक ५ फेब्रुवारी रोजी होणार असून या निवडणुकांसाठी भाजपच्या वतीने उमेदवारांनी बुधवारी (दि.२१) जल्लोषात उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे तसेच राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली ही अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया झाली.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून ढोल-ताशांच्या गजरात व घोषणांसह रॅली काढण्यात आली. (पान २ वर..)

### उरणमध्ये १२ जागांसाठी ७५ उमेदवारी अर्ज दाखल

**उरण :** जिल्हा परिषद व उरण पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी बुधवारी १२ जागांसाठी एकूण ७५ अर्ज भरले आहेत. यात पंचायत समितीसाठी ४६ तर जिल्हा परिषदेसाठी २९ अर्ज दाखल झाले आहेत. यात उरणच्या विविध राजकीय पक्षांतील अनेक इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या इच्छुकांनी शांत करण्यासाठी नेत्यांचे प्रयत्न सुरू आहेत. यात त्यांना यश मिळते का ते पहावे लागेल. यासाठी पक्षांच्या बैठकांना सुरुवात झाली आहे.



**खालापूर : भाजप, शिवसेना आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांनी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी व आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारांचे अर्ज दाखल केले. या वेळी महायुतीच्या माध्यमातून मोठे शक्तिप्रदर्शन करण्यात आले.** (वृत्त पान २ वर..)

## निवडक

### छत्तीसगडमध्ये नऊ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**छत्तीसगड :** गरियाबंद जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यातल्या एका महिलेने जिल्ह्यातल्या इतर नक्षलवाद्यांना शरण येण्याचे आवाहन केले आहे. छत्तीसगढमध्ये गेल्या दोन वर्षांत दोन हजारहून अधिक नक्षलवाद्यांनी शस्त्र खाली ठेवून मुख्य प्रवाहधारित सामील व्हायचा निर्णय घेतला आहे.

### अंतराळवीर सुनिता विल्यम्स यांची सेवानिवृत्तीची घोषणा

**नवी दिल्ली :** भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर सुनिता विल्यम्स यांनी नासामधल्या आपल्या २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती घेतली आहे. गेल्या महिन्याच्या २७ तारखेपासून त्या सेवानिवृत्त झाल्याची माहिती नासाने दिली. सुनिता विल्यम्स यांनी आपल्या सेवाकाळात ३ अंतराळ मोहिमांमध्ये भाग घेत अंतराळात ६०८ दिवस काढले आहेत. याचबरोबर त्यांनी ९ वेळा मिळून ६२ तासांचे स्पेसवॉकही केले आहे.

## जीवनात यशासाठी खेळाचीही नितांत गरज -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खेळ हा केवळ शारीरिक व्यायामाचा भाग नसून मन एकाग्र करण्यासाठी आणि जीवनात यश मिळवण्यासाठी खेळाचीही नितांत गरज आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी क्रीडा महोत्सवावेळी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक क्रीडा महोत्सव बुधवारी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा विविध गटांमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धांची अंतिम फेरी बुधवारी (दि.२१) झाली. दरवर्षीप्रमाणे विद्यार्थी या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असल्याने यंदाही त्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये पारंपारिक क्रीडा ज्योत पेटवून आणि खेळाडूंना शपथ देऊन या स्पर्धेचा रीतसर शुभारंभ करण्यात आला.

विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या पालकांसाठीही विशेष खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पालकांसाठी बुक बॅलन्स आणि रस्सीखेच यांसारखे प्रकार घेण्यात आले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल पालकांनी विद्यालयाच्या प्रशासनाचे विशेष आभार मानले. विद्यार्थ्यांसाठी धावणे, तीन चाकी शर्यत आणि बॉक्स क्रिकेट अशा विविध स्पर्धा रंगल्या, तर लहान मुलांनी सादर केलेल्या दोन नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन विजयी स्पर्धकांचे अभिनंदन केले. (पान २ वर..)

## उत्तम आरोग्य, फिटनेस आणि प्रभावी व्यक्तिमत्वाची सांगड घाला -परेश ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वार्षिक क्रीडा स्पर्धा हा महात्मा फुले महाविद्यालयाचा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा भाग आहे. सध्याचे युग हे स्पर्धेचे असून यामध्ये टिकून राहण्यासाठी केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर उत्तम आरोग्य, फिजिकल फिटनेस आणि प्रभावी व्यक्तिमत्व यांची सांगड घालणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी वार्षिक क्रीडा महोत्सवा उदघाटनावेळी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या मैदानावर मंगळवारी या महोत्सवाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन झाले. हा क्रीडा महोत्सव २० ते २४ जानेवारी या कालावधीत रंगणार असून यात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटील, प्राध्यापक डॉ. लक्ष्मण गवळी, प्राध्यापक डॉक्टर आर. पी. म्हात्रे, सुनीता काटकर, ललिता अवचिते, अनंता जाधव, डॉ. प्रफुल्ल वाशेणीकर, प्रवीण गायकर, यशवंत उलवेकर, संभाजी बडे, ममता चव्हाण, हर्षदा नाईक, एन. डी. गवंडी यांच्यासह अनेक मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**खालापूर : माघी गणेशोत्सव सोहळ्यानिमित्त अष्टविनायक महड मंदिरात एका दिव्यांग असलेल्या कलाकाराने गणपती बाप्पाची आकर्षक अशी काढलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.**

## अटल पेन्शन योजनेला २०३१पर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने असंघटित आणि अल्प उत्पन्न गटातील कोट्यवधी नागरिकांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. अटल पेन्शन योजनापुढील २०३० - ३१ पर्यंत सुरू ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाचा कोणताही आधार नसलेल्या कामगारांसाठी हा निर्णय अत्यंत दिलासादायक मानला जात आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार अटल पेन्शन योजनेसाठी केंद्र सरकारचे आर्थिक सहकार्य सुरूच राहणार आहे. यामध्ये योजनेचा प्रचार आणि प्रसार, क्षमता वृद्धी आणि विकासाशी संबंधित उपक्रमांसाठी निधी दिला जाणार आहे. तसेच, भविष्यात पेन्शन वितरणात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी गॅप फंडिंगला देखील मान्यता देण्यात आली आहे, ज्यामुळे योजना दीर्घकाळ आर्थिकदृष्ट्या सक्षम राहील.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ६० वर्षांनंतर दरमहा १००० ते ५००० रुपये

Atal Pension Yojana

इतकी हमी स्वरूपाची मासिक पेन्शन दिली जाते. पेन्शनची रक्कम लाभार्थी करत असलेल्या योगदानावर अवलंबून असते. ही योजना विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारीवर काम करणारे मजूर, छोटे व्यापारी आणि ग्रामीण भागातील श्रमिकांसाठी तयार करण्यात आली आहे, ज्यांना कोणतीही औपचारिक पेन्शन सुविधा उपलब्ध नसते.

केंद्र सरकारच्या मते, अटल पेन्शन योजना ही वृद्धावस्थेतील आर्थिक सुरक्षिततेसाठी एक मजबूत आधार आहे. या योजनेमुळे लोकांना निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळतोच, शिवाय अधिकाधिक नागरिकांना औपचारिक आर्थिक व्यवस्थेशी जोडण्यासही मदत होते. त्यामुळेच योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी जनजागृती आणि प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला जात आहे.

९ मे २०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या अटल पेन्शन योजनेचा मुख्य उद्देश देशात 'पेन्शनयुक्त समाज' उभारणे हा आहे, जिथे प्रत्येक नागरिक निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर राहू शकेल. कमी पण नियमित योगदानाच्या माध्यमातून ही योजना सुरक्षित भविष्यासाठी विश्वास निर्माण करते.

सरकारी आकडेवारीनुसार, १९ जानेवारी २०२६ पर्यंत अटल पेन्शन योजनेशी आठ कोटींपेक्षा अधिक नागरिक जोडले गेले आहेत. योजनेवरील वाढता विश्वास आणि सहभाग लक्षात घेता, दीर्घकालीन सरकारी पाठबळ आवश्यक असल्याचे केंद्र सरकारचे मत आहे.

## ठाकरे गटाचे अमित मोरे भाजपत

**महाड :** माजी गृहराज्यमंत्री तथा महाडचे माजी आमदार प्रभाकर मोरे यांचे पुत्र अमित मोरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने रायगड जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. महाड तालुक्यात झालेल्या या पक्षप्रवेशामुळे भारतीय जनता पक्षाला बळ मिळाले असून शिवसेना ठाकरे गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे.

महाडमध्ये आयोजित पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते अमित मोरे यांनी अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते. (सविस्तर पान ५ वर..)

# खालापूर तालुक्यातील जि.प.आणि पं.स. उमेदवाराचे अर्ज दाखल

## तीन आमदारांची उपस्थिती

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष,शिवसेना आणि आरपीआय या महायुतीच्या उमेदवारांनी आमदार प्रशांत ठाकूर,आमदार महेश बालदी व आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल केले,

यावेळी महायुतीच्या माध्यमातून मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले.उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे,मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, सनी यादव,जेष्ठ नेते विनोद भोईर,जेष्ठ नेते गोविंद बैलमारे,तालुका प्रमुख संदेश पाटील,चौक सरपंच रितू ठोंबरे, भूषण पारंगे,नगरसेवक राजू गायकवाड, नरेश पाटील यांच्यासह चौक,वासांबे,वडगांव व आत्करगाव मतदार संघातील अनेक महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे तालुक्यात महायुतीच्या उमेदवारांची पकड मजबूत झाली आहे. यामुळे महाविकास आघाडीत चलबिचल सुरू झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी दमदार नेतृत्व दिल्याने कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत.



खालापूर तालुका राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्वाचा तालुका म्हणून ओळखला जातो.येथील चारही जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती मतदार संघ मातब्बर म्हणून ओळखले जातात. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात देखील महत्वाचे समजले जातात.चौक जिल्हा परिषद हा अनुसूचित जमाती स्त्री साठी राखीव असून त्यातील चौक व हाल हे गण देखील अनुसूचित जमाती साठी राखीव आहेत.चौक जिल्हा परिषद साठी महायुतीकडून सौ. संगीता विजय निरगुडा यांना भारतीय जनता पक्षा कडून उमेदवारी देण्यात आली आहे.तर चौक पंचायत समिती साठी भाजप कडून अरुणा पारधी तर हाल गण मधून शिवसेना पक्ष कडून रितेश बळीराम जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. चौक हा जिल्हा परिषद मतदार संघ हा भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला आहे. वासंबे जिल्हा परिषद म्हणून भाजप कडून नेहा भूषण पारंगे, तर रीस गणातून कृष्णा पारंगे व वासंबे गणातून अर्चना आत्माराम भोईर दोन्ही गण भाजप साठी सोडण्यात आले आहेत.

वाशिवली जिल्हा परिषद साठी शिवसेना पक्षाकडून ज्ञानेश्वर गायकवाड, वाशिवली गणातून वडगांव सरपंच गौरी गडगे व सावरोली गणातून माधुरी संदेश पाटील यांना भाजप कडून उमेदवारी देण्यात आली आहे. तर आत्करगाव जिल्हा परिषद साठी भारतीय जनता पक्षाच्या रेश्मा राजेश पाटील या माजी जिल्हा परिषद सभापती नरेश पाटील यांच्या सुनबाई आहेत, तर साजगाव गणातून रोहिणी येरम व खानाव गणातून भाई उर्फ रघुनाथ शिंदे हे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांना शिवसेनेतून उमेदवारी देण्यात आली आहे. सर्व उमेदवार प्रशासकीय कामकाज करण्यात हुशार असून अनेकांनी पदे भूषवली आहेत. आजच्या महायुतीच्या शक्ती प्रदर्शनाने खालापूर पंचायत समितीवर महायुतीचा सभापती बसेल असेच चित्र दिसून आले.

# भुवनेश्वर जि. प. मतदारसंघातून अमित घाग यांचा भाजपकडून अर्ज दाखल

**धाटाव : प्रतिनिधी**



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजताच रोहा तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. बुधवारी (दि. २१) उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असताना भारतीय जनता पार्टीचे रोहा तालुकाध्यक्ष अमित हरिभाऊ घाग यांनी ४१ भुवनेश्वर जिल्हा परिषद मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, आणि यामुळे संपूर्ण तालुक्यात भाजपाच्या गोटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रायगड जिल्हा परिषद व रोहा पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी शेवटचा दिवस होता. दुपारी ३ वाजेपर्यंत रोहा तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गटांसाठी एकूण ३४, तर ८ पंचायत समिती गणांसाठी ६५ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली.

अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवसापर्यंतही महाविकास आघाडी, महायुती किंवा इतर स्थानिक युती–आघाड्यांबाबत स्पष्टता दिसून आली नाही. त्यामुळे आता अर्ज छाननी व माघारीच्या कालावधीत कोण कोणासोबत जाणार, की काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भुवनेश्वर ४१ जिल्हा परिषद मतदारसंघ हा रोहा तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा मतदारसंघ मानला जातो. संघटनात्मक ताकद, जनतेशी थेट संपर्क, तसेच सातत्यपूर्ण सामाजिक–राजकीय कार्याच्या जोरावर अमित घाग यांची उमेदवारी भाजपासाठी निर्णायक ठरणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तालुकाध्यक्ष म्हणून त्यांनी गेल्या अनेक वर्षांत पक्ष संघटना मजबूत करत भाजपाला रोहा तालुक्यात नवसंजीवनी दिली आहे.

४१ भुवनेश्वर जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकारी तथा रोहा तालुक्याचे प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्याकडे दाखल करण्यात आला. अर्ज दाखल करताना भाजपाचे विविध पदाधिकारी, युवा व महिला मोर्चाचे कार्यकर्ते तसेच समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भुवनेश्वर ४१ जिंकायचाच असा निर्धार कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, तालुक्यातील इतर मतदारसंघांमध्येही भाजपाने ताकदवान उमेदवार उभे केले आहेत. धाटाव गणामधून निलिमा सचिन मोरे, भुवनेश्वर पंचायत समितीसाठी अमित हरिभाऊ घाग व सचिन जानू मोरे, घोसाळे जिल्हा परिषदेसाठी निलिमा सचिन मोरे, तर घोसाळे पंचायत समितीसाठी श्रद्धा अमित घाग यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

या वेळी रोशन चाफेकर (सरचिटणीस, युवामोर्चा दक्षिण रायगड), कृष्णा बामणे (सरचिटणीस, रोहा तालुका भाजपा), नरेश कोकरे (अध्यक्ष, युवा मोर्चा रोहा तालुका), रिया कासार (अध्यक्ष, महिला मोर्चा), परेश चितळकर, ज्ञानेश्वर जाधव, स्वप्निल वाळंज, राकेश चाफेकर, वैभव कुलकर्णी, दीपक पवार, निलेश धुमाळ, हाजी कोठारी यांच्यासह भाजपाचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नीलिमा धैर्यशील पाटील यांचा जांभुळपाडामधुन जिल्हा परिषद उमेदवारी अर्ज दाखल

**पाली : प्रतिनिधी**

रायगडातील सुधागडात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची व अस्तित्वाची बनली आहे. माजी जिल्हा परिषद अध्यक्षा आणि खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी ॲडव्होकेट नीलिमा धैर्यशील पाटील या जांभुळ पाडा सुधागडातून जिल्हा परिषद निवडणूक लढविणार आहेत. (दि.२१ ) रोजी पालीत शक्तिप्रदर्शन करीत उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ दीपा भोसले यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला.



सुधागड तालुक्यात भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी अजित पवार पक्षात युती असून निलीमाताई पाटील यांना निवडून देण्यास भाजप व राष्ट्रवादीचे नेते पदाधिकारी ताकतीने पुढे सरसावले आहेत तर कार्यकर्तेही जोमाने कामाला लागले आहेत. कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पार्टीला निलीमाताई पाटील यांना विजयी करणे गरजेचे आहे, कारण खासदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांची प्रतिष्ठा यानिमित्ताने पणाला लागली आहे.

भाजप– राष्ट्रवादी युती विरोधात इतर सर्व पक्ष (मनसे व वंचित बहुजन आघाडी वगळून )सारे एकवटले असल्याने ही निवडणूक मोठी चुरसपूर्ण होणार आहे. राज्यात आणि देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकुशल नेतृत्वात राज्य व देशाने सर्वच क्षेत्रात मोठी प्रगती साधली असून विकासाचा आलेख ही उंचावला आहे,

त्यामुळे जनता विकासाला अधिक चालना देण्यासाठी भाजपला प्रेम व सहयोग देईल, व भाजप पक्ष या निवडणुकीतही आपलं वर्चस्व प्रस्थापित करेल असा विश्वास खासदार धैर्यशील पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील,भाजप नेते प्रकाश देसाई, गीता ताई पालरेचा, सौ. ज्योत्स्ना प्रकाश देसाई, सतीश देसाई, जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता,अशोक कांबळे,यशवंत पालवे,रवींद्र देशमुख,मिलिंद देशमुख,सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे,विठ्ठल सिंदकर,आलाप मेहता,आरिफ मणियार,मनोहर नाना देशमुख, ॲड: सुभाष पाटील, प्रणाली शेठ,माजी तालुका अध्यक्ष हिराकांत भगत,प्रकाश ठोंबरे,अजय खंडागळे,माजी तालुका अध्यक्ष किशोर जोशी,मनोहर देशमुख आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपचे अशोक वारगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**अलिबाग : रायगड जिल्हा परिषद काविर गटमधून भारतीय जनता पक्षातर्फे भाजप अलिबाग दक्षिण तालुका अध्यक्ष अशोक धर्मा वारगे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी खानाव ग्रामपंचायत सरपंच अजय नाईक, खानाव ग्रामपंचायत उपसरपंच निलेश गायकर, भाजप अलिबाग तालुका दक्षिण सरचिटणीस अमित म्हात्रे, भाजप उपाध्यक्ष विजयजी गायकर, भाजप युवा नेते भूमीत गाला उपस्थित होते.**



**तळा : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने २१ जानेवारी रोजी अखेरच्या दिवशी दोन जि.प.गट व चार पंचायत समिती गणात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. आज एकूण राष्ट्रवादी पक्षाचे ९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. या तळा तालुक्यातील जि.प.व पंचायत समिती निवडणुकीसाठी राष्ट्रवादी व भाजपा यांची युती झाल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे**

पान १ वरुन

## भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल; मान्यवरांची उपस्थिती

ही रॅली पनवेल तहसीलदार कार्यालयात पोहचून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. मंगळवारी केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघातून मंगेश वाकडीकर व वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातून कमला देशेकर यांनी, वावंजे पंचायत समिती गणासाठी आरती कुणाल काटे, चिंध्रण पंचायत समिती गणातून अंकुश खेर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील उमेदवारांनी बुधवारी (दि.२१) अर्ज दाखल केले.

अर्ज दाखल करताना आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद अरुणशेठ भगत, नगरसेवक व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, दशरथ म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, प्रवीण खंडागळे, विश्वजीत पाटील, ज्ञानेश्वर घरत, योगेश लहाने, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, यतीन पाटील, विनोद घरत, सुनील माळी, अनेश ढवळे, शिल्पा म्हात्रे, अपेक्षा जाधव, लीना पाटील, गौरी पाटील, प्रियांका गाताडे, सुजाता



घरत, अंकिता घरत, दिक्षा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रायगड जिल्हा परिषदेतील नेरे जिल्हा परिषद गणातून आत्माराम बाळू भस्मा, पाली देवद गणातून प्राची अमित जाधव, पळस्पे गणमधून हर्षदा अतुल घरत, वावेघर गणातून अनन्या अविनाश गाताडे, वडघर मधून सोनाली प्रकाश जितेकर, तर गव्हाण जिल्हा परिषद मतदार संघातून निकिता निलेश खारकर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

पनवेल पंचायत समिती मधील नेरे पंचायत समिती गणातून वर्षा सचिन केवारे, आदई पंचायत समिती भूपेंद्र सदाशिव पाटील, पालीदेवद वैशाली प्रविण सावंत, विचुंबे निलम प्रमोद भिंगारकर, पळस्पे गणातून राजेंद्र हरिचंद्र पाटील, कोन मधून योगिता योगेश लहाने, पोयंजे गणामधून अस्मिता अनंत पाटील, वावेघर संघातून राजू पाटील, करंजाडे रंजना सदाशिव वास्कर, वडघर मधून मनिषा गजानन पाटील, वहाळ गणामधून वितेश त्रिंबक म्हात्रे, गव्हाण गणातून जिज्ञासा मनोहर कोळी, केळवणे मधून शीतल अनंता माळी तर आपटा पंचायत समितीमधून मयूर शेलार यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले. उमेदवारी अर्जाची छाननी २२ जानेवारी रोजी होणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार असून व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

## जीवनात यशासाठी खेळाचीही नितांत गरज –लोकनेते रामशेठ ठाकूर

विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनीदेखील विद्यार्थ्यांना तसेच पालकांना उत्तेजन दिले व यशस्वी पालक व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

या सोहळ्यावेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक विकास घरत, रविंद्र जोशी, प्रदीप भगत, कुसुम म्हात्रे, रायगडचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, गटशिक्षणाधिकारी शाहू सत्पाल, केंद्रप्रमुख सचिन पाटील, प्रमोद वाघमोडे, श्रीकांत पाटील, अमित पातुरकर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, अविनाश कुलकर्णी, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका लांजूडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक, यांच्यासह विद्यालयाच्या पालक संघाचे प्रतिनिधी व शिक्षक उपस्थित होते.

# शक्ती प्रदर्शन करीत परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या आज नामनिर्देशन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस – उद्धव सेनेच्या परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांनी शक्ती प्रदर्शन करीत आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांनीही आज नामनिर्देशन पत्र दाखल केली.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे पुंडलिक पाटील, कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, उद्धव सेनेचे जिल्हा उपप्रमुख नितीन सावंत, महिला जिल्हा प्रमुख सुवर्णा जोशी, उपगराध्यक्ष संतोष पाटील, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, महिला विधानसभा अध्यक्ष ॲड. पूजा सुर्वे, महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, उद्धव सेना तालुका प्रमुख बाजीराव दळवी, महिला शहर प्रमुख मयुरी गजमल, मधुकर घारे आदींसह उमेदवार आणि कार्यकर्ते प्रशासकीय भवन मध्ये आले.

परिवर्तन विकास आघाडीच्या नारायण डामसे, बाबू घारे, सुनीता मोरे, उषा ठोंबरे, वर्षा दोरे –शेळके, नमिता घारे, चित्रा ठाकरे, कविता चंचे, नितीन धुळे, महेश खरे, भगवान चंचे, सुवर्णा ठाकरे, भारती घारे, सुवर्णा ठाकरे, भारती घारे, अक्षय तिटकारे आदी उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली.



## निवडक

### खाडी पुलाजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** वडघर खाडी पुलाजवळ एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्य वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष, रंग गोरा, बांधा मजबुत, अंगात नेसुन हीरवट रंगाचा हाफ बाहयांचा गोळ गळयाचा टी शर्ट, राखाडी रंगाची फुल नाइट पॅन्ट आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सपोनि प्रवीण फडतरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** घरातुन कामाला जाते असे सांगुन बाहेर गेलेली महिला अद्याप घरी परतली नसल्याने ती हरवल्याची



तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या महिलेचे नाव हे डॉली हुसेन शेख असून तिचे वय ३६ वर्षे, व्यवसाय घरकाम रंग-सावळा, केस काळे उंची अंदाजे ४ फुट ५ इंच, अंगाने मजबुत, चेहरा-गोल, नाक-सरळ, अंगात नेसुन-हिरव्या रंगाचा सलवार कमीज, पायात लाल रंगाची स्लीपर चप्पल भाषा-बंगाली, हिंदी बोलता येते अशा वर्णनाची सोबत ओपो कंपनीचा मोबाईल फोन त्या मध्ये जिओ कंपनीचे सिम कार्ड आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे ८६५५३५४१११ किंवा पोना रवींद्र पारधी ९३२६६७४६५६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सहा चाकी वाहन उलटले

**पनवेल :** शहरातील नाट्यगृहासमोरील प्रशासकीय भवनाचे काम सुरू आहे. या ठिकाणी दगडाने भरलेला सहा चाकी आयशर कंपनीचा हायवा २१ जानेवारी रोजी सकाळी



नऊच्या सुमारास पलटी झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. एमएच ४६ एफ ३०२३ या कंपनीचे सहा चाकी वाहन प्रशासकीय भवनाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी दगड टाकण्यासाठी आला होता. यावेळी काम चालू असलेल्या ठिकाणी वाहनाचे चाक मातीत रुतले आणि हे वाहन पलटी झाले. यात वाहनाचे नुकसान झाले असून दगड खाली कोसळले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. या वाहनाला बाहेर काढण्यासाठी क्रेनचा आधार घेण्यात आला.

### अपघातात पोलीस हवालदार जखमी

**पनवेल :** मोटरसायकल वरून जाणाऱ्या पोलीस हवालदाराच्या मोटरसायकलला क्रेटा कारने धडक दिली. या धडकेत पोलीस हवालदार बंडू बापू भिसे (वय ५०) हे जखमी झाले. या अपघाताप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात १८ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार बंडू भिसे हे कळंबोली येथे राहत असून नवी मुंबई पोलीस दलात नोकरी करतात. ते रबाळे एमआयडीसी येथे काम करत असून १७ जानेवारी रोजी ते रात्रपाळीवर होते. एमएच ०३ बीबी ६४१० ने रात्री आठच्या सुमारास पुरुषार्थ ब्रिज कामोठे येथे पोहोचले असता पाठीमागून आलेल्या काळया क्रेटा कारने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. यात त्यांच्या खांद्याला कॉलर बोनला फ्रॅक्चर झाले आणि त्यानंतर कारचालक पळून गेला.

### १४ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** डिजिटल अरेस्टच्या नावाने कायद्याचा धाक दाखवून खोटी माहिती सांगितली आणि व्हिडिओ कॉलनी नजर कैदेत ठेवून पैसे तपासणीच्या नावाने १४ लाख रुपयांचे ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी समाज १९ जानेवारी रोजी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ६५ वर्षीय ब्रिजलाल बरनवाल हे सेक्टर ३६ कामोठे येथे राहत असून त्यांना डिजिटल अरेस्टच्या नावाखाली कायद्याचा धाक दाखवण्यात आला तसेच खोटी माहिती सांगून २६ नोव्हेंबर २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ पर्यंत व्हिडिओ कॉलनी नजर कैदेत ठेवले आणि पैसे तपासणीच्या नावाने १४ लाख रुपये घेऊन ऑनलाईन फसवणूक केली.

### दिव्यांग मुलीला सोडून पालकाचे पलायन

**पनवेल :** एका ३ वर्षीय लहान दिव्यांग मुलीला तिच्या



पालकाने पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सोडून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पनवेल रेल्वे स्टेशन फलाट क्र. ३ वर कर्तव्यावर असणाऱ्या पुरुष होमगार्डला अंगात निळा टी-शर्ट व ब्राऊन पॅन्ट घातलेली ही रडत असताना मिळून आली. या मुलीच्या पालकांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. या मुलीला विचारपूस केली असता तिने फक्त तिचे नाव शिवानी एवढेच सांगितले. त्यानंतर त्या होमगार्डने मुलीला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी पालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या आरोपीव्यक्तीबाबत माहीती मिळताच पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२२७४६७१२२, ९८२१४२५४०४ किंवा महिला पोलीस हवा एस.एस. बोराटे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



**उरण : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार परिक्षीत प्रकाश ठाकूर यांनी ५५ केगाव गण पंचायत समिती उरण अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.**

# करंजा जेट्टीला भगदाड; प्रवाशांना धोका

**उरण : रामप्रहर वृत्त**

करंजा बंदराच्या जेट्टीला भले मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे या जलमार्गावर प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांना धोका निर्माण झाला आहे. या जेट्टीची दुरुस्ती करावी यासाठी करंजा बंदर विभागाने मेरिटाइम बोर्डाकडे प्रस्ताव पाठविला आहे, मात्र या मार्गावरील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता कोणताही अपघात होऊ नये यासाठी या जेट्टीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.



उरणहून मुंबईला ये-जा करण्यासाठी अटलसेतू आणि लोकल मार्गाचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षात अलिबाग (रेवस) ते उरण (करंजा) या जलमार्गावरील प्रवासी संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. ही संख्या लक्षात घेत मेरिटाईम बोर्डाने या मार्गावर अर्ध्या तासांनी बोट सेवा सुरू केली. यापूर्वी या मार्गावर एक बोट गेल्यानंतर तासभराची प्रतीक्षा करावी लागत होती. यातून उरणच्या करंजा ते अलिबाग रेवस या जलमार्गाने प्रवास सुरू आहे. त्यामुळे या मार्गावर कायम गर्दी असते. रेवस ते करंजा हा जलमार्गही बारमाही सुरू आहे. या वेळी गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांनी अलिबाग ते उरण दरम्यानच्या जलप्रवासाला प्राधान्य दिले जात आहे.

उरण किंवा अलिबाग या दोन्ही तालुक्यांना जोडणारी करंजा ते रेवस ही खाडी आहे. या खाडी मार्गातून शेकडो वर्षांपासून जलप्रवास सुरू आहे. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतील सर्वसामान्य नागरिक, व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार हे याच मार्गाने प्रवास करीत आहेत. अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे. त्यामुळे दररोज अलिबागला ये-जा करणारे प्रवासी आहेत. रस्ते मार्गाने हा प्रवास कोंडीचा आणि त्रासदायक आहे. जलमार्गाने कमी वेळात ये-जा करता येत असल्याने नागरिक या मार्गाने प्रवास करीत आहेत.

**करंजा बंदराला जोडणारी जेट्टीला भगदाड पडले आहे. येथील बांधकाम पूर्णत: निखळण्यापूर्वीच जेट्टीच्या दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. याबाबत लवकर पाठपुरावा करून काम केले जाईल.**
**-अनिल शिंदे,** बंदर अधिकारी, करंजा

## दुचाकीला वाहनाची धडक; तरुणाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रॉयल एनफिल्ड मोटरसायकलला अज्ञात वाहनाने धडक दिली आणि या धडकेत २२ वर्षीय अथर्व शेषराव खेडकर (राहणार सेक्टर १७ रोडपाली) याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी १८ जानेवारी रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अथर्व खेडकर हा कळंबोली, रोडपाली सेक्टर १७ येथे राहत असून झील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे येथे कम्प्युटर इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षाला शिक्षण घेत आहे. १७ जानेवारी रोजी अथर्व हा रोडपाली कळंबोली ते पुणे येथे कॉलेजला जाण्यासाठी मित्राची मोटरसायकल रॉयल एनफिल्ड एम एच १६ डी एन ६९६९ घेऊन निघाला. तो जुना मुंबई पुणे महामार्गावर रात्री साडेआठच्या सुमारास बारवई पुलाच्या शंभर मीटर अंतरावर पुणे लेनवर आला असताना अज्ञात वाहनाने त्याच्या मोटरसायकलला धडक दिली.

या धडकेत अथर्व जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघातानंतर अज्ञात वाहन चालक कोणतेही मदत न करता पळून गेला.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी आन्वीक्षिकी - द आर्ट ऑफ नर्चरिंग फ्युचर जनरेशन या संकल्पनेअंतर्गत जिल्हास्तरीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाला समर्पित आणि भविष्यातील पिढी घडवण्याच्या ध्येयाने प्रेरित असलेल्या या प्रदर्शनासाठी एआय सायन्स अँड सस्टेनेबिलिटी ही संकल्पना ठेवण्यात आली होती.

या सोहळ्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, राहुल घरत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, रायगडचे सहाय्यक उपशिक्षण निरीक्षक बाबासाहेब चिमणे उपस्थित होते. तसेच गणित-विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष अनिल पाटील, नॅशनल चिल्ड्रन्स सायन्स काँग्रेसचे राज्य समन्वयक विश्वास कोरडे आणि विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनात पनवेल, ठाणे आणि नवी मुंबई या भागांतील विविध शाळांमधून एकूण १०७ प्रकल्प सादर करण्यात आले होते. या उपक्रमात सर्वाधिक गुण मिळवून रेडक्लिफ स्कूलने यंदाचा मानाचा व्हिजनरी व्हॅनगार्ड अवॉर्ड आपल्या नावे केला.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक करतानाच अशा व्यासपीठांमुळे उद्याचे शास्त्रज्ञ घडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना तंत्रज्ञानाचा वापर समाजहितासाठी करण्याचे आवाहन केले.

## गव्हाण येथे माघी गणेशोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण (खालची आळी) येथे मंगलमूर्ती मित्र मंडळाच्या वतीने माघी गणेशोत्सव २०२६ साजरा करण्यात येणार आहे. यंदा मंडळाचे ४०वे वर्ष आहे.



उत्सवाची सुरुवात गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता श्रींच्या आगमनाने होणार आहे. दुपारी १२ वाजता श्रींचा जन्मोत्सव, पाळणा आरती व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. सायंकाळी ६ वाजता महाआरती तर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सुरेश महाराज पाटील (बेलवली) यांचे कीर्तन होणार आहे. रात्री ९.३० वाजता लहान मुलांसाठी खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता महाआरती, सायंकाळी ४ वाजता महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ, सायंकाळी ७ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसाद, तर रात्री ८ वाजता आई एकविरा महिला भजन मंडळ, डोंबिवली यांचे भजन होणार आहे. शनिवार, २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता महाआरती, दुपारी १२ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ५ वाजता महाआरती व त्यानंतर श्रींचा विसर्जन मिरवणूक सोहळा होणार आहे.

या सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंगलमूर्ती मित्र मंडळ, गव्हाण (खालची आळी), ता. पनवेल, जि. रायगड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**पनवेल : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय सांगली आणि जिल्हा थाई बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत सीकेटी इंग्लिश माध्यम शाळेतील दहावीच्या पार्थ प्रमोद निकम याने सुवर्णपदक पटकावले. याबद्दल त्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.**



पनवेल : महापालिकेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीचे घवघवीत यश संपादित केले. या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १७मधून भाजप महायुतीचे उमेदवार अ‍ॅड. प्रकाश बिनेदार हे भरघोस मतांनी विजयी झाले. याबद्दल त्यांनी मंगळवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही प्रकाशन बिनेदार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी श्याम साळवी, श्रीशेठ भंडारी, अमोल जाधव, अ‍ॅड. शिवकुमार कांबळे, अ‍ॅड. अक्षय मिसाळ, यश बिनेदार, स्वाती बिनेदार, जिज्ञासा बिनेदार, कुसुम भोजने, रेखा खंडीझोड, सुप्रिया भोजने, ममता गमरे, रसिका भोजने, संतोष म्हस्के, प्रकाश सोनावळे, उत्तम भंडारी, प्रथमेश भंडारे, साईनाथ भटकल, आदिनाथ बोरुडे, मानस मोहिते, सुरज पिल्लई आदी उपस्थित होते.



**पनवेल : विंचुबे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे भरत पाटील यांची निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : केळवणे पंचायत समिती उमेदवार शितल अनंत माळी आणि आपटा पंचायत समिती उमेदवार मयुर शेलार यांनी बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.**

## तक्का येथे हळदी-कुंकू आणि तिळगुळ समारंभ; महिलांमध्ये उत्साह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकरसंक्रांतीचे औचित्य साधून महिलांमधील स्नेह आणि आपुलकीचा बंध अधिक दृढ करण्यासाठी तक्का येथे हळदी-कुंकू व तिळगुळ समारंभाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. महिला भगिनींना एकत्र येऊन सण साजरा करता यावा आणि सामाजिक संवाद वाढावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला नगरसेविका प्रियांका कांडपिळे, वर्षा ठाकूर आणि स्वाती कोळी यांनी भेट देऊन महिलांशी संवाद साधला.





या कार्यक्रमामुळे परिसरातील महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. पनवेलमधील तक्का येथे पार पडलेल्या या समारंभाचे आयोजन प्रतिक्षा बहिरा आणि प्रणाली बहिरा यांच्या वतीने करण्यात आले होते. या सोहळ्यात परिसरातील शेकडो माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

पारंपारिक पद्धतीने साजऱ्या झालेल्या या सोहळ्यात महिलांना तिळगुळ वाटप करण्यात आले आणि सर्व महिलांनी हळदी-कुंकवाचा सण अत्यंत उत्साहात साजरा केला.

## संपादकीय

# जगासमोरचे संकट

सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे म्हणून ग्रीनलँड ट्रम्प यांना हवे आहे. आणि ग्रीनलँडच्या प्रश्नातून युरोपने अमेरिकेची साथ सोडल्यास रशिया आणि चीनलाही ते सोयीचेच ठरणार आहे. उर्वरित जगाला मात्र यातून आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागणार आहे.

**ट्रम्प हे अवघ्या जगासाठी डोकेदुखी ठरले आहेत. त्यांच्या लहरीनुसार त्यांना जे काही हवेसे वाटेल, त्याकरिता ते काय वाट्टेल ते करू शकतात याची चुणूक त्यांनी व्हेनेझ्युएलातील कारवाईतून जगाला दाखवली आहे. त्यामुळेच युरोपीय देशांनी त्यांची ग्रीनलँडबद्दलची धमकी गांभीर्याने घेतली आहे. भौगोलिकदृष्ट्या ग्रीनलँड अमेरिकेच्या जवळ नाही. पण अमेरिकेला हा भूभाग कायमच हवासा वाटत आला आहे. याचे कारण अमेरिका, युरोप आणि रशिया यांच्यामध्ये असलेला ग्रीनलँड सामरिकदृष्ट्या अमेरिकेसाठी अतिशय महत्वाचा ठरतो. त्यामुळेच दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिका ग्रीनलँडवर आपल्या फौजा वास्तव्याला ठेवून आहे. पण आता ट्रम्प यांना हा बर्फाळलेला प्रदेश अमेरिकेचाच असावा असे वाटू लागले आहे. भौगोलिकदृष्ट्या ग्रीनलँड हा बेटवजा देश युरोप खंडाचा भाग आहे. त्याचे संरक्षण व परराष्ट्र धोरण व्यवस्थापन महायुद्धाच्या काळापासून डेन्मार्ककडे राहिले आहे. डेन्मार्कसह युरोप खंडातील ब्रिटन, फ्रान्स आदी देशांनी ट्रम्प यांच्या ग्रीनलँड गिळंकृत करण्याच्या भूमिकेला विरोध दर्शवला आहे. विशेषत: इंग्लंडचे पंतप्रधान कीएर स्टार्मर यांनी हा विरोध व्यक्त करण्याची हिंमत दाखवली. ग्रीनलँडच्या मुद्द्यावर आपण अमेरिकेची साथ देणार नाही हे त्यांनी आपल्या देशातील जनतेला स्पष्टपणे सांगितले. फ्रान्स, जर्मनी, नॉर्वे, स्वीडन आदी अन्य युरोपीय देशांनाही ट्रम्प यांची भूमिका मान्य नाही. डेन्मार्कच्या पंतप्रधान मेट फ्रेडरिकसन यांनीही ट्रम्प यांना उघड विरोध दर्शवला. युरोपीय देशांनी असा विरोध दर्शवताच ट्रम्प यांनी त्यांचे अलीकडचे आवडीचे अस्त्र उगारले. या देशांवर दहा टक्के आयात शुल्क आकारण्याची घोषणा अमेरिकेकडून करण्यात आली आहे. या सगळ्या घडामोडींचा परिणाम जगभरातील शेअरबाजारांवर स्वाभाविकच होणार होता. तसा तो होतो आहे. युरोपीय देशांनी अमेरिकेसोबतचा व्यापार करार रोखण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. अमेरिकेच्या उत्पादनांवर आयातशुल्क वाढवण्याचा विचारही सुरू झाला आहे. युरोपीय देशांकडून अमेरिकेविरोधात 'ट्रेड बझुका' हा आर्थिक बळजबरी विरोधी कायदा वापरला जावा असा मतप्रवाहही युरोपात आहे. युरोप आणि अमेरिकेदरम्यान असे व्यापारयुद्ध सुरू झाल्यास त्याचे मोठे परिणाम जगभराला भोगावे लागतील. ग्रीनलँडमध्ये संयुक्त लष्करी सरावासाठी युरोपीय देशांनी सैन्यही पाठवले. असे सराव याआधी तेथे झाले असले तरी यावेळी त्याला अमेरिकाविरोधाची पार्श्वभूमी आहे. या सगळ्या घडामोडींमुळे भारतीय भांडवली बाजारावरही परिणाम होतो आहे. ग्रीनलँडचा प्रश्न विकोपाला गेला तर जगभरातील देशांना आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागेल. दुसऱ्या महायुद्धानंतर अवघ्या जगाने काही मूल्ये स्वीकारली होती. ट्रम्प मात्र अशी कुठलीही मूल्ये मानत नाहीत असेच दिसते आहे. त्यांनी ज्या पद्धतीने व्हेनेझ्युएलावर हल्ला केला, त्यातून त्यांनी ही मूल्ये पुरती पायदळी तुडवली आहेत हे स्पष्ट झाले. व्हेनेझ्युएला काय आणि ग्रीनलँड काय, कुठल्याच देशाच्या सार्वभौमत्वाची तमा ते बाळगतील असे दिसत नाही. अवघी ५६ हजार लोकसंख्या असलेल्या ग्रीनलँडचे स्वत:चे सरकार असले तरी त्याच्या संरक्षणाची जबाबदारी डेन्मार्ककडे आहे. हिटलरशी लढताना स्वतःच्या दुबळेपणामुळे डेन्मार्कने अमेरिकेकडे मदतीची याचना केली होती. आता अमेरिकेविरोधात हा देश अन्य एखाद्या बलाढ्य महासत्तेकडे गेल्यास काय होईल?**

# पोलादपूर तालुक्याला रोजगाराची गरज

**खबरबात**
**शैलेश पालकर**




पोलादपूर तालुक्यात सध्या शिक्षणाच्या संधी आणि तरूणांमधील बेरोजगारी वाढीस लागल्याचे विपर्यस्त चित्र विकासाच्या गप्पा करणाऱ्या कोण्याही नेतृत्वास शरमेने मान खाली घालायला लावणारे असले तरी ही शर्मनाक परिस्थिती या नेतृत्वामुळेच झाली आहे. यावर आमजनतेचा विश्वास बसेल अशी परिस्थिती सद्यस्थितीत दिसत नाही. गेल्या तपापूर्वी तालुक्यात पंचतारांकित एमआयडीसी होऊ घातली होती. मात्र, ही एमआयडीसी घालवून ज्यांनी राजकीय प्रौढी मिरविली; त्यांना आता या तालुक्यातही यावेसे वाटत नाही, ही बाब दूर्लक्षित करण्यासारखी नाही.

कोलादपूर तालुक्यातील सवाद-हावरे ते दिवील तुर्भे भागात कधीही दुबार पिके घेतली जात नव्हती. तशी मानसिकता तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये क्वचितच आणि अभावाने आढळते. या परिसरात शेतजमिनींपेक्षा ओसाड जमिनीचे क्षेत्र तुलनेत अधिक आहे. मात्र, टेबललॅण्ड या सध्याच्या जमिन व्यावसायिकांच्या जमिनीच्या वर्णनामध्ये चपखल बसेल, असे येथील विस्तिर्ण क्षेत्र होते. ही जमिन संपादित करून त्यावर थेट विदेशी गुंतवणूकदारांमार्फत मॅकॅनिकल इंडस्ट्रिज उभ्या राहणार होत्या. यामुळे एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह तालुक्यातील सर्व सुशिक्षितांना चांगल्याप्रकारे रोजगारसंधी उपलब्ध होऊ शकत होत्या. एमआयडीसीच्या नियोजित प्रकल्पाचे स्वरूप पंचतारांकित दर्जाचे होते. त्यामुळे निश्चितच होऊ घातलेले प्रकल्प पर्यावरणास घातक नव्हते. तालुक्यात एमआयडीसीची औद्योगिक वसाहत निर्माझ झाली तर होणारा विकास शेजारच्या महाड तालुक्याकडून अनुभवाने शिकून अनुकरण करण्यासारखा असताना याच महाड तालुक्याच्या नेत्यांच्या राजकीय चटया उचलण्याची पोलादपूर तालुक्यातील पुढाऱ्यांची पूर्वापार राजकीय सवय तालुक्याला नडली आणि पंचतारांकित एमआयडीसीला निकराने विरोध करण्याची भूमिका येथील शेतकरी वर्गामध्ये फोफावली. यास पोलादपूरच्या भवितव्याचा विचार न करणाऱ्या कोणत्या नेत्याची साथ होती, ते संपूर्ण तालुक्यातील जनतेला माहिती आहे. या राजकीय करंटेपणामुळे पोलादपूर तालुक्यात होऊ घातलेल्या पंचतारांकित एमआयडीसीला विरोध करण्यासाठी सप्ततारांकित शेतकरी संघर्ष समिती निर्माण झाली. महाड प्रांताधिकारी कार्यालयापर्यंत-मोर्चे निदर्शने करून या पंचतारांकित एमआयडीसीला तीव्र विरोध केला गेला. शिवसेना-भारतीय जनता पार्टी युती सरकारच्या काळात अशा प्रकारच्या जनआंदोलनाद्वारे संघटनकौशल्य दाखविण्याचा प्रकार ज्या कोणी नेत्याने केला; त्या नेत्याचे तत्पूर्वी, पोलादपूर तालुक्यातील अस्तित्व आणि त्यानंतरचे अस्तित्व पाहता मुंबईकर मंडळींच्या प्रभावाने जशी भगवी शिवशाही अवतरली होती; तोच फॉर्म्यूला ही सप्ततारांकित शेतकरी संघर्ष समिती स्थापन करून पंचतारांकित एमआयडीसी घालविण्याची अवबुध्दी तालुक्याला सुचली होती. आज तालुक्यात सर्वच भागातील जमिनी विकण्यासाठी जमीन व्यावसायिकांकडून दाखविल्या जात असताना त्या पंचतारांकित एमआयडीसीला ज्या भागातील शेतकऱ्यांनी जमिनी संपादन करण्यास विरोध दर्शविला होता; त्या भागातही हे जमीन व्यावसायिक फिरत आहेत, ही वस्तुस्थिती त्या विरोधातील फोलपणा सिध्द करीत आहेत. पंचतारांकित एमआयडीसीमुळे तालुक्यातील रस्ते, पाणीपुरवठा, नागरी सुविधा, राहणीमान उंचावण्यासोबतच संरचनात्मक विकासाचा पाया रोवला जावून आजपर्यंत तालुका विकसित होण्यापर्यंत सक्षम राहिला असता. मुंबई, सुरत, पुणे, अहमदाबाद, बडोदा आदी भागात जाऊन नोकऱ्या करणारे पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील तरूण येथेच रोजगार संधी मिळवून तालुक्याच्या विकास व समाजजीवन उंचावण्यास हातभार लावू शकले असते. महाड एमआयडीसीच्या तिसऱ्या टप्प्यात जेव्हा पंचतारांकित एमआयडीसी स्थलांतरीत गेली. तेव्हा ताणल्यावर तुटले या पश्चातापाच्या भावनेने सप्ततारांकित शेतकरी संघर्ष समितीचा विजयही आनंदोत्सवात बदलला गेला नाही. आता जमिनींचे व्यवहार होताना त्या जमिनींच्या दलालाचे नांव खरेदीदार म्हणून लागते आणि त्याच्यामार्फतच काही उद्योजक या जमिनींची खरेदी करीत असल्याने भविष्यात एखादा उद्योग या जमिनीवर उभा राहीलाच तर त्यामध्ये प्रकल्पग्रस्त शेतकरी म्हणून या शेतकऱ्यांच्या पिढया रोजगार संधी मिळवू शकणार नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने पोलादपूर तालुक्याच्या आगामी असंख्य पिढयांचे रोजगार संधी आणि कायमस्वरूपी संरचनात्मक विकासासंदर्भात नुकसान करणारा निर्णय म्हणून पंचतारांकित एमआयडीसी घालविण्याची कृती मानली जात आहे. मध्यंतरी तुर्भेखुर्द, तुर्भे खोंडा, तुर्भे बुद्रुक परिसरामध्ये मिनी एमआयडीसीची मागणी होऊ लागली होती. मात्र, इकोसेन्सेटीव्ह झोनमध्ये अडकलेला हा परिसर मिनी एमआयडीसीसाठी उपलब्ध होणे केव्हाही अशक्य असल्याने आता पोलादपूरकरांना तालुका पुनर्रचना करण्यासाठी आणि पोलादपूरच्या पाण्यावर चाललेली महाड औद्योगिक वसाहत पोलादपूर तालुक्यात समाविष्ट करण्यासाठी आंदोलन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# भारतीय संस्कृतीचा गौरव- श्री गुरु तेगबहादुर साहिब

'हिंद दी चादर', म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख....

सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. 'एकम सत् विप्रा बहुधा वदंती' म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत.

गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो.

शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.

**-रमाकांत दाणी,प्रसिद्धी समन्वयक,**
संचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर



## बदलते तंत्रज्ञान


# पर्सनल असिस्टंट प्रमाणे काम करेल जीमेल

आता तुमचा जीमेल इनबॉक्स केवळ ईमेल प्राप्त करणार नाही, तर एका पर्सनल असिस्टंटप्रमाणे तुमच्यासाठी कोणता ईमेल सर्वात महत्त्वाचा आहे हे देखील सांगेल. गुगलचे म्हणणे आहे की हा नवीन इनबॉक्स जेमिनी ३ च्या रीजनिंग पॉवरवर काम करेल. यामुळे तो ईमेलची यादी दाखवण्याऐवजी संदर्भानुसार आवश्यक कृती सुचवेल.



सर्च बॉक्समध्ये प्रश्न विचारून जुने मेल शोधता येतील
आता तुम्हाला जुने ईमेल शोधण्यासाठी कीवर्ड सर्च करण्याची किंवा मॅन्युअली स्क्रोल करण्याची गरज भासणार नाही. तुम्ही जीमेलच्या सर्च बॉक्समध्ये साध्या भाषेत प्रश्न विचारू शकाल. उदा. - गेल्या वर्षी या प्रोजेक्टवर काय निर्णय झाला होता? किंवा फ्लाइटचे तिकीट कोणी पाठवले होते?.
जेमिनीची रीजनिंग पॉवर तुमच्या जुन्या ईमेलचे विश्लेषण करेल आणि अचूक माहिती शोधून थेट उत्तर देईल. सध्या हे वैशिष्ट्य गुगल एआय प्रो आणि अल्ट्रा सबस्क्रायबर्ससाठी उपलब्ध आहे.
गुगलने सर्च इंजिनप्रमाणे जीमेलमध्येही एआय ओव्हर व्ह्यु हे फीचर सादर केले आहे. अनेकदा अनेक लोक एकाच ईमेल थ्रेडमध्ये बोलतात, ज्यामुळे जुना मेसेज शोधणे कठीण होते. आता एआय ओव्हरव्ह्यू अशा लांब संवादाला काही मुद्द्यांमध्ये सारांशित करेल.
वेळेनुसार नाही, गरजेनुसार दिसतील ईमेल
गुगल 'एआय इनबॉक्स' नावाचे एक टूल देखील आणत आहे. हा इनबॉक्स तुमचे ईमेल वेळेनुसार दाखवण्याऐवजी त्यांच्या महत्त्वाप्रमाणे सेट करेल.
हे तुमच्या महत्त्वाच्या सेंडर्सना, येणाऱ्या डेडलाईन्सना आणि महत्त्वाच्या बिलांना किंवा अपॉइंटमेंट रिमाइंडर्सना ओळखून त्यांना सर्वात वर दाखवेल. गुगलचा दावा आहे की हे पूर्णपणे सुरक्षित आहे.गुगलने जीमेलसाठी 'एआय इनबॉक्स' फीचर सादर केले आहे, जे महत्त्वाची कामे आणि ईमेलचा सारांश दाखवेल.
'हेल्प मी राइट' आता सर्वांसाठी मोफत, शैली देखील जुळवेल याव्यतिरिक्त, 'स्मार्ट रिप्लाय'ला अपग्रेड करून 'सजेस्टेड रिप्लाय' करण्यात आले आहे

# शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



**निमित्त**

स्वामी रामानंद तीर्थ यांचा आज स्मृतिदिन. ते स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर होते. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे कर्मठ ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील भगवानराव प्राथमिक शाळेत शिक्षक होते. रामानंदांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी झाले. त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा दिली आणि पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बीए व एमए पदवी संपादन केली. त्यानंतर १९२६मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले.

रामानंद तीर्थ गिरणी कामगारांच्या लढ्यात ते सक्रिय सहभागी झाले. ना. म. जोशींनी स्वामीजींना कामगारविषयक विधेयकाची माहिती घेण्यासाठी ऐन हिवाळ्यात दिल्लीला पाठविले. नंतर त्यांनी अध्यात्माची कास धरली. आपल्या जन्मनावाचा त्याग करून भिक्षुकी अंगीकारली. त्यानंतर हिप्परगा जि. उस्मानाबाद येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे १९३०मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. ते १९३५मध्ये सक्रिय राजकारणात सहभागी झाले

नंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड येथे १९५०मध्ये नांदेड एज्युकेशन संस्थेची स्थापना केली आणि नांदेड शहरात पीपल्स कॉलेज काढले. त्यानंतर त्यांनी १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकांत गुलबर्गा मतदारसंघातून निवडणूक लढवून संसदेत प्रवेश केला.

हैदराबादचे विभाजन करून संयुक्त महाराष्ट्र, विशाल आंध्र व संयुक्त कर्नाटक अशी राज्ये निर्माण करावीत, अशी स्वामीजींची धारणा होती. पं. जवाहरलाल नेहरूंचा हैदराबादच्या विभाजनाला विरोध होता. दरबनी संस्कृतीच्या एक मिश्र भाषिक राज्याचा प्रयोग या दृष्टीने ते हैदराबादकडे पाहत होते. अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन १९५३मध्ये हैदराबादला झाले. स्वामी रामानंद तीर्थ हे स्वागताध्यक्ष होते. स्वामीजींनी आपल्या भाषणामध्ये हैदराबादच्या विभाजनाचा प्रश्न मांडू नये, असे पं. नेहरूंना वाटत होते, पण स्वामीजींनी तोच प्रश्न मोठ्या आग्रहाने मांडला. पं. नेहरू नाराज झाले व प्रथा सोडून स्वामीजींना कार्यकारिणीमध्येसुद्धा घेतले नाही. स्वामीजींनी हा मुद्दा मांडला नसता तर कदाचित ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले असते.

हैदराबादचे विभाजन झाले नसते तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येऊच शकला नसता याकडे दुर्लक्ष होते याची खंत वाटते. स्वामी रामानंद तीर्थ यांना शिक्षणाविषयी विलक्षण तळमळ होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आकांक्षेने प्रेरित झालेली युवकांची फौज तयार करण्याचे त्यांचे ध्येय होते, तर नांदेडला पीपल्स कॉलेज काढताना स्वामी रामानंद तीर्थ यांची दृष्टी नवभारताच्या उभारणीसाठी नवी पिढी तयार करण्याची होती. अशा या महनीय व्यक्तीचा २२ जानेवारी १९७२ रोजी मृत्यू झाला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# व्यायामामुळे शरीर निरोगी बनण्यास होते मदत

सध्या धावपळीच्या आयुष्यात आपण आरोग्याकडे लक्ष देत नाही. जास्त वेळ एकाच ठिकाणी बसून काम करणे आणि सोशल मीडियावर सर्वाधिक वेळ घालवणे जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनलाय. अपुरी झोप, पोषक आहार न घेणे, जंक फूड खायला खूप आवडणे, सतत तणाव जाणवणे आणि व्यायामाची सवय नसणे इत्यादी गोष्टींमुळे आपण निरोगी जीवन जगू शकत नाही, पण नियमित २० मिनिटे चालण्यामुळे तुम्हाला फरक जाणवू शकतो. या विषयी 'होलिस्टिक हेल्थ'तज्ज्ञ डॉ. मिकी मेहता यांनी माहिती दिली.



पाच ते दहा मिनिटे व्यायाम केल्यामुळे शरीरातील असंतुलन सुधारण्यास मदत होते. याशिवाय शरीराला भरपूर ऑक्सिजन मिळते आणि सर्व अवयवांचे कार्य सुधारण्यास मदत होते. एकाग्रता, सहनशक्ती, लवचिकता, स्टॅमिना वाढतो.

**जम्पिंग जॅक कॉम्बो** : सुरुवातीला तीन मिनिटे साधा वॉर्मअप व्यायाम करावा, ज्यामध्ये मानेची हालचाल, हात आणि खांदे फिरवणे, पाय हलवणे, समोर-मागे, आजू-बाजूला वाकणे इत्यादी प्रकारचा व्यायाम करावा. जम्पिंग जॅक हा मुळात हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम व्यायाम आहे.

**दोरी उड्या मारणे** : या व्यायामामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत होते. यात जास्तीत जास्त कॅलरी वापरल्या जातात आणि चयापचय क्रिया सुधारतात.

**बॉडीवेट स्क्वॅट्स** : सर्वांत आधी सरळ उभे राहा आणि तुमचे पाय आणि खांदे सरळ ठेवा. त्यानंतर पाठ ताठ करून खुर्चीवर बसतात तसे मागच्या बाजूला बसा. एका मिनिट असेच राहा.

**गुडघे वर उचला** : जेव्हा तुम्ही जागेवर धावता तेव्हा तुमचे गुडघे वर उचलून छातीच्या दिशेने आणा. हा व्यायाम एक मिनिटासाठी करा. या व्यायामामुळे कॅलरी जास्त वापरले जातात आणि हृदयाचे स्नायू बदलतात.

**लंज** : हा व्यायाम करताना ताठ उभे राहावे. उजवा पाय पुढे टाकावा आणि डावा पाय गुडघ्यातून दुमडून जमिनीच्या दिशेने खाली वाकवा. त्यानंतर डावा पाय पुढे टाकावा आणि उजवा पाय गुडघ्यातून दुमडून जमिनीच्या दिशेने खाली वाकवा.

**बर्पी** : छाती, हात, पाय आणि स्नायूच्या आरोग्यासाठी हा व्यायाम फायदेशीर आहे. सुरुवातीला स्क्वॅट्स स्थितीत उभे राहा. त्यानंतर दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवा. कंबर ताठ असायला हवी. दोन्ही हात जमिनीवर खाली टेकवा, नंतर पाय मागे घेऊन जा आणि पुश अपच्या स्थितीत या.

# महाडमध्ये ठाकरे उबाठा गटाला धक्का

## ◆ अमित मोरेंना उमेदवारी; भाजपत दाखल



**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी महाड भाजप ने शिवसेना उबाठा गटाला धक्का देत माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचे चिरंजीव व माजी जिल्हा परिषद सदस्य अमित मोरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी भाजपात प्रवेश करून आज अखेर आपला उमेदवार जे दाखल केला आहे.

रायगड जिल्हा परिषद निवडणूक आज उमेदवार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपा वतीने दोन पंचायत समिती व एक जिल्हा परिषद अशा तीन ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. भाजपा नेते नामदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी मंत्री प्रभाग करून मोरे यांचे चिरंजीव अमित मोरे यांचा भाजपामध्ये प्रवेश घडवून आला आहे. त्यांच्या समवेत उबाठा चे विभाग प्रमुख महेंद्र जोगळे, युवा सेना पदाधिकारी सागर नगरकर यांनी देखील भाजपात प्रवेश केला.

मंगळवार २१ जानेवारी रोजी सायंकाळी पेण येथे भाजपा जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत आमदार रवी पाटील यांच्या निवासस्थानी हा प्रवेश झाला असून, यात्रसंगी भाजपाचे निवडणूक प्रतिनिधी सतीश धारप, परिषद सदस्य बिपिन महामुणकर, नागेंद्र राठोड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला. रायगड जिल्हा परिषद व महाड पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीमध्ये भाजप व राष्ट्रवादीची युती होते की नाही असा प्रश्न राष्ट्रवादी व भाजप कार्यकर्त्यांना पडला होता. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी हा तीडा सुटला असून महाडमध्ये राष्ट्रवादी व भाजप एकत्रित निवडणूक लढवत असून भाजपच्या वतीने नाते पंचायत समिती मतदारसंघातून ॲड. सुरज जामदार व नडगाव तर्फे बिरवाडी पंचायत समिती मतदार संघातून चैत्राली विनोद दिघे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

तर सर्व महाडकरांना आश्चर्याचा धक्का देत माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचे चिरंजीव व माजी जिल्हा परिषद सदस्य अमित मोरे यांनी भाजपा प्रवेश करून करंजाडी जिल्हा परिषद मतदार संघातून आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. याप्रसंगी माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, भाजपाचे बिपिन महामुणकर, नागेंद्र राठोड, निलेश देवगिरकर, निलेश तळवटकर, मंजुषा कुद्रिमोती यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. अमित मोरे यांच्या निवडणूक प्रचारासाठी दस्तुरखुद्द ना प्रविण दरेकर हे प्रचारासाठी येणार असून, या तिन्ही उमेदवारांना जिंकून आणण्याचे आवाहन ना प्रवीण दरेकर यांनी भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला केले आहे.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ६८/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ०३/०१/२०२६ दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाड व विळे- भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.......विविध ठिकाणच्या व्हिटी पंप आणि व्हिएनसी पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १९,९५,१२८.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३०/०१/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क – हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पाले बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७ | ३ | ०-२५-८० पो.ख. ०-०४-०० एकूण ०-२९-८० | ४.३७ | १) जयदास धर्मा भोपी, २) नरेश धर्मा भोपी, ३) प्रमोद धर्मा भोपी, ४) मेधनाथ धर्मा भोपी. |

**पनवेल.**
**दिनांक : २१/०१/२०२६.**

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,**
**प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,**
**नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. नं. ९०२२३१७७७२.**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील परिशिष्ट 'अ'मध्ये नमुद केल्याप्रमाणे महसूल अभिलेखात असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाच्या शेतजमिन मिळकती आहेत. सदर मिळकतींचे स्वामित्व (Title) हक्क तपासणेकामी खालील शेतजमीन मिळकतींची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**परीशिष्ट 'अ'**

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे लोणिवली, तालुका, पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | सर्व्हे नं. गट. नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मे. वाधवा कंस्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. रजि. ऑफिस ३०१, प्लॅटिना, प्लॉट नं.सी–५९, ब्लॉक बी.के. सी. बांद्रा, (पु) मुंबई. ४०००९८ करिता प्रतिनिधी मनोहर छाब्रिया | ५१ | १ | ०–७६–२० पो.ख. ०–१९–९० ०–९६–१० | १४.२५ |
| | ५४ | २ | ०–०३–०० | ०.२५ |
| | ५४ | ३/ब | ०–५८–०० पो.ख. ०–०४–७० ०–६२–७० | ३.८७ |
| | ५८ | १/अ | ०–३७–०० पो.ख. ०–२७–८० ०–६४–८० | ५.५० |
| | ११६ | ४ | ०–३९–५० पो.ख. ०–०६–३० ०–४५–८० | ६.०० |
| | ११७ | ४ | ०–४९–९० पो.ख. ०–०४–४० ०–५४–३० | १.२५ |
| | ११९ | १/अ | ०–४३–०० पो.ख. ०–१७–५० ०–६०–५० | ७.६९ |
| | १६७ | २/अ | ०–१०–०० पो.ख. ०–१०–०० ०–२०–०० | २.३५ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतींवर, वा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार, दावा हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतींचे स्वामित्वाचा तपशील आमचे अशिलांस देऊ व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २१/०१/२०२६**

**सही/–**
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com



### लवादासमक्ष
### जाहीर सूचना

**(मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ च्या कलम ८४ अन्वये)**

**द्वारा डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., दुकान क्र. २४, १ला मजला, "स्कायसिटी" रिटेल, लेक रोड, ऑफ एलबीएस मार्ग, भांडुप पोलीस स्टेशनजवळ, भांडुप (पश्चिम), मुंबई-४०००८०.**

**ज्याअर्थी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**, यांनी वादी म्हणून निम्न उल्लेखित विवाद निर्णयाकरिता माझ्याकडे पाठविला आहे, मी याद्वारे तुम्हा सर्वांना वरील पत्त्यावर अशा प्रश्नांवर आणि सदर लवादी खटल्यामधील दाव्याचे उत्तर देण्याकरिता व्यक्तिशः किंवा लवादी खटल्याशी संबंधित सर्व भौतिक प्रश्नांची उत्तरे देण्यास प्राधिकृत आणि सक्षम असलेल्या योग्यरित्या सूचना दिलेले वकील किंवा ॲडव्होकेट यांच्याद्वारे दि. ०९ फेब्रुवारी, २०२६ रोजी दु. १२.३० वा. उपस्थित राहण्याकरिता आणि पुढे सदर लवादाच्या खटल्यामधील दाव्याचे उत्तर देण्याकरिता समन्स देत आहे

| अ. क्र. | विवाद/प्रकरण क्र. | प्रतिवादीचे नाव आणि पत्ता |
|---|---|---|
| १. | **ARB/DNSB/SPK/450 of 2025** **डीएनएस बँक लि.,** ... **वादी** विरुद्ध श्री. काजरोळकर सिद्धेश गणेश आणि इतर ... **प्रतिवादी** | **श्री. काजरोळकर सिद्धेश गणेश** डी-१०३, सद्गुरू कृपा, बामनोली रोड, माणगाव, जि. रायगड ४०२१०४. **हॉटेल चंद्रिका रिसॉर्ट** **भागीदारः श्री. काजरोळकर सिद्धेश गणेश** कोस्ते-निजामपूर रोड, कोस्ते खुर्द, ता. माणगाव, जि. रायगड ४०२१०४ **श्री. काजरोळकर सिद्धेश गणेश** वाकडाई नगर, उतेखोल, माणगाव, रायगड ४०२१०४. ...प्रतिवादी क्र. १ **श्री. काजरोळकर प्रतिक गणेश** डी-१०३, सद्गुरू कृपा, बामनोली रोड, माणगाव, जि. रायगड ४०२१०४. ...प्रतिवादी क्र. २ |

नोंद घ्यावी की, वर उल्लेखिलेल्या दिवस, वेळ आणि ठिकाणी तुम्ही उपस्थित न राहिल्यास, लवादी खटल्याची तुमच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी आणि निश्चिती करण्यात येईल.

दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी माझ्या सही आणि शिक्क्याअंतर्गत पारित.

**द्वारा/-**
**डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.,**
**दुकान क्र. २४, १ला मजला, "स्कायसिटल" रिटेल लेक रोड,**
**ऑफ एलबीएस मार्ग,भांडुप पोलीस स्टेशन,भांडुप (पश्चिम), मुंबई - ४०००८०.**

शिक्का

सही/-
श्री. सदानंद पी. कुलकर्णी
लवाद



मा. राणे सो. कोर्ट

### जाहीर नोटीस

**ॲड. जी. आर. कडव**
**ॲड. प्रणाली सोहनी**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १०५/२०२६
नि. नं. ८/ड
ने.ता. २५/०२/२०२६

१. श्री. पंढरीनाथ काना म्हात्रे
वय ७३ वर्षे, धंदा – शेती
रा. माणघर पो. कुंडेवहाळ
ता. पनवेल जि. रायगड

२. श्री. वसंत काना म्हात्रे
वय ६९ वर्षे, धंदा शेती
रा. ओवळे पो. पारगांव
ता. पनवेल जि. रायगड

३. श्री. तुकाराम काना म्हात्रे
वय ६३ वर्षे, धंदा शेती –रा. करंजा ता. उरण जि. रायगड

४. कै. विष्णू काना म्हात्रे यांचे वारस :
–४/१. श्री. संतोष विष्णू म्हात्रे वय ५४ वर्षे, धंदा शेती
४/२. श्री. मंगेश विष्णू म्हात्रे वय ५१ वर्षे,
धंदा – शेती

४/३. श्री. सुनिल विष्णू म्हात्रे
वय – ४८ वर्षे, धंदा शेती अर्जदार नं. ४/१ ते ४/३
सर्व रा. ओवळे पो. पारगांव ता. पनवेल जि. रायगड

५. कै. बाबूराव काना म्हात्रे यांचे वारस :
५/१. श्री. धिरज बाबूराव म्हात्रे
वय – ३१ वर्षे, धंदा शेती
५/२. श्रीमती मंदा बाबूराव म्हात्रे
वय – ६० वर्षे, धंदा गृहिणी अर्जदार नं.
५/१ व ५/२ दोघेही रा. ओवळे
पो. पारगांव ता. पनवेल जि. रायगड

५/३. सौ. हर्षदा धिरज घरत पूर्वाश्रमीची
हर्षदा बाबूराव म्हात्रे वय २८ वर्षे, धंदा
गृहिणी रा. सावरखार ता. उरण जि. रायगड.

} अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

} सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ५ यांचे वडिल कै. काना गोसावी म्हात्रे हे ता. १२/४/२०१४ रोजी मौजे ओवळे ता. पनवेल जि. रायगड येथे निधन झाले आहेत. तसेच त्यांची पत्नी कै. नर्मदा काना म्हात्रे हयाही ता. २२/७/१९८६ रोजी मौजे ओवळे ता. पनवेल येथे निधन झाल्या आहेत. कै. काना गोसावी म्हात्रे यांचे पश्चात त्यांना अर्जदार १ ते ५/३ हे कायदेशीर वारस आहेत.

कै. काना गोसावी म्हात्रे यांचे नांवे व सामाईक हिश्यास असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| गांव/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| दापोली LAAR - 6 | १४६ | १ | ०–१८–८० पो.ख. ०–००–२० एकूण ०–१९–०० |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै. काना गोसावी म्हात्रे यांस गांवठाण विस्तार योजने अंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै. काना गोसावी म्हात्रे यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणा–या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज ता. २०/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली

**सही/–**
**क. लिपिक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधिश,**
**व. स्तर पनवेल**



### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई–मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२
वेबसाईट – panvelcorporation.com

### स्वारस्याची अभिव्यक्ती (देकार)
### जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिका अं.भु.क्र. ४५ ऊर्दू शाळेची मोकळी जागा दिनांक ३०/०१/२०२६ ते दिनांक ०३/०२/२०२६ या कालावधीकरीता पीर करम अली शाह बाबांच्या ऊरुसानिमित्त विविध खेळ व दुकाने लावणेकामी भाड्याने देणेबाबत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका तात्पुरत्या स्वरुपात जाहिर दरपत्रक मागवित आहेत.

संबंधितांनी त्यांची दरपत्रके पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ड कार्यालयातील मालमत्ता विभागात दिनांक २७/०१/२०२६ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात सादर करावीत. सदर दिनांकानंतर आलेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

प्राप्त दरपत्रकांची छाननी दिनांक २७ /०१/२०२६ रोजी ४:०० वाजता उप आयुक्त, मालमत्ता ह्यांच्या दालनात करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | विषय | देकार रक्कम |
|---|---|---|
| १) | पनवेल महानगरपालिका अं.भु.क्र. ४५ ऊर्दू शाळेची मोकळी जागा दि. ३०/०१/२०२६ ते दि. ०३/०२/२०२६ या कालावधीकरीता पीर करम अली शाह बाबांच्या ऊरुसानिमित्त विविध खेळ व दुकाने लावणेकामी भाड्याने देणेबाबत. | २५,०००/– |

**अटी व शर्ती :–**

१) सदर परवानगीची मुदत दिनांक ३०/०१/२०२६ ते दिनांक ०३/०२/२०२६ या कालावधीकरीता देणेत येत आहे.
२) सदर ऊरुसासाठी आवश्यक पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग यांचे कार्यालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांची तसेच अन्य शासकीय विभागाची परवानगी घेणेची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.
३) उक्त कामाकरीता देकार देताना लेटरहेडसोबत नाव, संपूर्ण पत्ता, फोन नं. आणि त्यासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक यांची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
४) अं.भु.क्र. ४५ मधील जागा आहे त्या स्थितीत देण्यात येईल, मुदत संपल्यानंतर ते परत सुस्थितीत करुन देणेचे आहे.
५) सदरचे मैदान तात्पुरत्या स्वरुपात वापरण्याकरीता हमीपत्र / प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.
६) ऊरुसात वापर करण्यात येत असलेल्या विद्युत शक्तीवर चालणाऱ्या यंत्रसामुग्री उदा. पाळणे, खेळणी इ. तांत्रिक यंत्रणा सुस्थितीत व धोका विरहीत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
७) सदर कार्यक्रमात कोणत्याही प्रकारची जिवीत व वित्तीय हानी झाल्यास त्यास परवानगीधारक जबाबदार राहील.
८) सदरचे देकार स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहिल. याबाबतीत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम असेल.
९) ऊरुसाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या जागेव्यतिरिक्त इतरत्र कोणत्याही ठिकाणी दुकाने लागणार नाहीत याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. अन्यथा सदरचे अतिक्रमण समजून महानगरपालिकेमार्फत कारवाई करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(डॉ. वैभव विधाते)**
**उपायुक्त, (मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:–पमपा/माव्य./२४२६/प्र.क्र. ०१/३१/२०२६**
**दिनांक :– २१/०१/२०२६**



### पेण नगरपरिषद, पेण
### जाहिर निविदा सूचना
सन २०२५–२०२६

पेण नगरपरिषद पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून जाहिर निविदा मागविणेत येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फार्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पेण नगरपरिषद आरोग्य विभागाकरीता ६ नग फॉगिंग मशीन (धुरीकरण) खरेदी करणे. | २५००/– | ५,००/– | कार्यादेश आदेशापासून ३० दिवस |
| २ | स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२०२६ करिता ट्रॅक्टर ड्रायव्हर सहित भाड्याने पुरविणे. | ३०००/– | ५००/– | कार्यादेश आदेशापासून १ वर्षे |
| ३ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत शहरात विविध ठिकाणी ॲक्रलिकमध्ये (Promulgating) बॅनर्स तयार करून लावून देणे | २०००/– | ३००/– | कार्यादेश आदेशापासून ३० दिवस |

**कामाच्या अटी व शर्ती**

१) निविदा विक्री कालावधी दिनांक २२/०१/२०२६ ते दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) मिळू शकतील
२) निविदा जमा करण्याचा कालावधी दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
३) निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक ०४/०२/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार
४) याबाबतची अधिक माहिती नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**जा.क्र/पेनप/का.५/लेखा/२०२५/२३६**
**पेण नगरपरिषद कार्यालय, पेण**
**दिनांक:–२१/०१/२०२६**

**सही/–**
**(श्री. जीवन पाटील)**
**मुख्याधिकारी**
**पेण नगर परिषद, पेण**

# जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती

## राज्य शासनाच्या निर्णयामुळे हजारो रहिवाशांना दिलासा; रखडलेले प्रकल्प मार्गी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील जुन्या, जीर्ण व राहण्यायोग्य नसलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, त्यामुळे रखडलेले अनेक पुनर्विकास प्रकल्प मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः वाशी, सेक्टर-९ आणि घणसोली सेक्टर-७ मधील सिडकोनिर्मित जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार असल्याचे म्हटले जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या पत्राच्या अनुषंगाने नगरविकास विभागाने अर्बन रिनीव्हल स्कीम (यूआरएस) अंतर्गत पुनर्विकासासंदर्भात नियमांबाबत स्पष्टता दिली आहे. त्यामुळे



रहिवासी, गृहनिर्माण संस्था आणि विकासकांमधील संभ्रम दूर झाला असून प्रत्यक्ष प्रकल्पांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वाशी, सेक्टर-९ येथील जॅप्स (जेएपीएस) को-ऑप. हौसिंग सोसायटी व नक्षत्र अपार्टमेंटसारख्या सिडकोनिर्मित संकुलांमधील बहुतांश घरे ही ३० चौ. मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळाची आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निम्न व मध्यम उत्पन्न गटासाठी बांधलेली ही घरे अनेक वर्षांच्या वापरामुळे व अपुऱ्या देखभालीमुळे धोकादायक अवस्थेत पोहोचली आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने शासनाकडे तातडीच्या पुनर्विकासाची आवश्यकता निर्दर्शनास आणून दिली होती.

शासनाने स्पष्ट केले आहे की, सध्या ३० चौ. मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळाच्या घरांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना पुनर्विकासानंतर किमान ३७.५० चौ. मीटरचे घर देणे योग्य आहे आणि ही भूमिका कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे लहान घरधारकांना अधिक सुरक्षित व प्रशस्त घरे मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. तसेच, यूआरएसअंतर्गत असलेले काही नियम हे अनधिकृत बांधकामे वा झोपडपट्टी पुनर्विकासापुरते मर्यादित असल्याने, सिडकोने अधिकृतरीत्या बांधलेल्या इमारतींना त्या अटी लागू होणार नाहीत, हेही शासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार पुनर्विकास प्रकल्पांमध्ये रहिवासी वापर अथवा संमिश्र (रहिवासी व वाणिज्य) वापर, तसेच वाणिज्य वापराचे प्रमाण याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त किंवा उच्चस्तरीय समितीला देण्यात आले आहेत. वास्तव अडचणी असल्यास पार्किंग नियमांमध्ये सवलत देता येणार असून, अन्यथा नियमांनुसार पूर्ण पार्किंग देणे बंधनकारक राहणार आहे. तसेच उद्यान, खेळाची मैदाने यांसारख्या खुल्या जागा एकत्रित किंवा टप्प्याटप्प्याने देण्याबाबतही स्थानिक पातळीवर निर्णय घेता येणार आहे.

यूआरएसअंतर्गत आवश्यक असलेली १० टक्के ॲमेनिटी स्पेस स्वतंत्र भूखंडावर देणे शक्य नसल्यास ती इमारतीत बांधलेल्या स्वरूपात देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील दोन प्रस्तावांना शासनाने हिरवा कंदील दिल्याने रहिवाशांना थेट लाभ होणार आहे.

# महिला ग्राहकावर दुकानदार महिलेकडून हल्ला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील सेक्टर १५ येथील साईप्लाझा इमारतीजवळ रविवारी (दि.१८) रात्री सुमारे १० वाजता ऑनलाईन मागवलेल्या चिकन न्युडल्समध्ये चिकन नसल्याचा जाब विचारल्याने एका महिला ग्राहकावर दुकानदार महिलेने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी जखमी महिलेने खांदेश्वर पोलीस ठाणे येथे रितसर तक्रार नोंदवली आहे.

हरिग्राम केवाळे येथे राहणाऱ्या २५ वर्षीय निकिता मंडल यांनी स्विगीच्या समाजमाध्यमाद्वारे ऑनलाईन चिकन न्युडल्सची ऑर्डर दिली होती. ऑर्डर मिळाल्यानंतर न्युडल्समध्ये चिकन नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत तक्रार करण्यासाठी त्या थेट 'एन्जॉय स्नॅक्स अ‍ॅण्ड चायनीज' या दुकानात पोहोचल्या. दुकानात त्यावेळी ३७ वर्षीय ललिता प्रसाद उपस्थित होत्या. निकिता यांनी चिकन नसल्याबाबत जाब विचारताच दोघींमध्ये शाब्दिक वाद झाला. हा वाद वाढत जाऊन शिवीगाळ झाली. तक्रारीनुसार, याच दरम्यान ललिता यांनी दुकानातील मोठ्या पळीने निकिता यांच्यावर मारहाण केली. या हल्ल्यात निकिता जखमी झाल्या. मारहाणीनंतर निकिता यांनी तात्काळ खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आणून दिला.

पोलिसांनी तक्रार नोंदवून संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ऑनलाईन अन्नसेवांमुळे ग्राहकांचा वेळ व सोय जरी वाढली असली, तरी तक्रार मांडताना ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर ठरत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या या हाणामारीमुळे ऑनलाईन खाद्यपदार्थ महागात पडल्याची चर्चा होती.

ग्राहकांनी तक्रार करताना संयम राखावा, तसेच विक्रेत्यांनीही ग्राहकांशी सभ्य व कायदेशीर पद्धतीने वागावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे हे करीत आहेत.

# प्रसाद हनुमंते यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून साहित्य व कला क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवणारे प्रसाद हनुमंते यांची दादासाहेब फाळके मुंबई विभागीय चित्रपट युनियनच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष अजित महामुणकर यांनी प्रसाद हनुमंते यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली.

या वेळी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संतोष आमले यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून प्रसाद हनुमंते यांचे अभिनंदन केले. चित्रपट सृष्टीमध्ये कलाकारांच्या



न्याय व हक्कांसाठी गेली अनेक वर्ष कार्यरत असलेली ही प्रतिष्ठित संघटना स्व. दादासाहेब फाळके यांच्या वंशजांकडून चालवली जाते. दिग्गज कलाकारांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' देऊन सन्मानित करण्याची परंपरा ही संघटना जपते. अशा संघटनेचे सदस्यत्व मिळण्याचा मान हनुमंते यांना मिळाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निर्मला फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निर्मला फाउंडेशन गुळसुंदे यांच्या वतीने रसायनी परिसरातील गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय , वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमिक विद्यालय, रिलायन्स फाउंडेशन स्कूल या शाळांतील एस.एस.सी परीक्षा २०२५ मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त २९ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, Idemitsu कंपनीचे डेप्युटी



मॅनेजर गोपाळ सुरवसे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवा पाटील, मुख्याध्यापक झिंगे सर, राहुल चिपळेकर आदी उपस्थित होते. निर्मला फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा हेतू सांगितला तसेच विद्यार्थ्यांना कौतुकाची शाब्बासकी दिल्याने विद्यार्थी अधिक जोमाने प्रगती करून आपल्या पुढील आयुष्यात यशस्वी होतील हा विश्वास मांडला.

उत्तम शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन कसे घेतले पाहिजे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गोपाळ सुरवसे यांनी शिक्षण घेत असताना कितीही कठीण प्रसंग आले तरी आपण आपले ध्येय कसे पूर्ण करावे यावर मार्गदर्शन केले. रयतच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यामध्ये यशस्वी होत असताना आई वडिलांना विसरू नका हा संदेश दिला. या कार्यक्रमावेळी छावण्या विद्यालयाचे मुख्याध्यापक पद्माकर झिंगे, राजे प शाळा खेडूपाडा येथील उपशिक्षक कैलास रायकर, तुंगार तर विभाग विद्यामंदिर गोसुंदे येथील उपशिक्षिका मुल्ला के.एफ., रा. जि.प.शाळा कासप येथील उपशिक्षिका सौर रूपाली काळे यांना निर्मला फाउंडेशन तर्फे गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चावणे विद्यालयाचे मुख्याध्यापक पद्माकर झिंगे सर यांनी निर्मला फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले तसेच विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार निर्मला फाउंडेशनचे सचिव प्रशांत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन रुपाली पाटील, सृष्टी पाटील यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विकास पाटील, रुबेन पाटील, रूपम पाटील, कल्पना पाटील, प्रियंका पाटील, वृषाली ठोंबरे यांनी सहकार्य केले.

# मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे चिर्ले येथे माघी गणेशोत्सव



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिर्ले येथील मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे मंगलमूर्ती निवासस्थानाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव होणार आहे.

या गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरू असून, रणजीत माळी, सुविचार माळी, शंकर माळी, मीनल माळी, सुजय माळी, प्रणिश गोंधळी, मृगमय माळी, विघ्नेश माळी, आयान माळी, स्वरा माळी, श्राव्या माळी, दिव्यांश माळी यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली हा माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. उत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर देण्यात आला आहे.

यामध्ये गुरुवारी गणेश जयंतीच्या मुख्य दिवशी सकाळी महाअभिषेक व महापूजा होईल. त्यानंतर १०:३० वाजता रामकृष्ण हरिपाठ मंडळ चिरले यांच्या हरिपाठाचा कार्यक्रम होईल. दुपारी बारा वाजता गायिका मनस्वी माळी हिच्या सुरावटीतून श्री गणेश जन्मोत्सवाच्या पाळणा गीताचे सादरीकरण व महाआरतीचा कार्यक्रम होईल. तदनंतर महाप्रसादाला सुरुवात होईल. यानंतर गायिका मनस्वी माळी, पारस वर्तक यांच्या भक्ती गीतांच्या सुरावटी ऐकावयास मिळणार आहेत. या वेळी मृग्मय माळी, पखवाज वादक म्हणून तर प्रणेश म्हात्रे बासरीच्या माध्यमातून साथसंगत करतील. रेशमा ठाकूर यांच्या सूत्रसंचालनातून काव्य दरबारमार्फत कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शंकर माळी, मीनल माळी, के एम मढवी यांनी दिली.

# सीकेटी विद्यालयात राष्ट्रीय युवक सप्ताह





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागा तर्फे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व तसेच युवक सप्ताह निमित्त 'स्क्रीन टाईम टू ॲक्टिव्हिटी टाईम' या विषयांतर्गत एक मार्गदर्शक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना या परिसंवादात सहभागी करून घेण्यात आले. १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच 'राष्ट्रीय युवक दिन' या प्रित्यर्थ पूर्ण आठवडा युवक सप्ताह' देशभरात साजरा केला जातो. मंगळवारी (दि.२०) सीकेटी विद्यालयात युवक सप्ताहानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) पनवेल महानगरच्या वतीने स्क्रीन टाइम टू ॲक्टिव्हिटी टाइम या महत्त्वपूर्ण विषयावर एक मार्गदर्शक परिसंवाद यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.

या परिसंवादाच्या प्रमुख वक्त्या म्हणून ऋतुजा भोर (अखिल भारतीय विद्यार्थी पनवेल महानगर मंत्री) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी युवकांना स्क्रीनवर घालवला जाणारा वेळ कमी करून तो रचनात्मक, शारीरिक आणि सामाजिक उपक्रमांकडे वळवण्याचे आवाहन केले. अभ्यास, खेळ, वाचन, सामाजिक सहभाग आणि स्व-विकास यांसारख्या उपक्रमांमुळेच युवकांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी अधोरेखित केले. परिसंवादादरम्यान माननीय मुख्याध्यापक संतोष चव्हाण सर यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. तसेच स्क्रीनच्या अति वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माननीय मुख्याध्यापकांनी सखोल चर्चा केली.

विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक समस्या सांगत आपण स्क्रीन पासून दूर कसे राहू शकतो व स्वतःवर स्व नियंत्रण कशा पद्धतीने आणू शकतो असे प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांचे निराकरण कुमारी ऋतुजा भोर व मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी उत्कृष्टरित्या केले. या चर्चेदरम्यान पालकांनी जास्तीत जास्त आपल्या पाल्यासोबत वेळ घालवावा असेही आवाहन माननीय मुख्याध्यापकांनी केले. या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करावा व आपले ज्ञान वाढवावे असेही विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी स्क्रीन टाईम कमी करून ॲक्टिव्हिटी टाइम वाढवण्याचा संकल्प केला. हा परिसंवाद युवकांमध्ये जागरूकता निर्माण करणारा व मार्गदर्शक ठरला. या वेळी इयत्ता नववीचे वर्गशिक्षक शशिकला मनोहर पाटील व स्मिता भालेकर तसेच सह.शिक्षक नितीन म्हात्रे सर उपस्थित होते. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी परिसंवादाच्या मुख्य वक्त्या ऋतुजा भोर यांचे विशेष आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# खारघरमध्ये ओबेसिटी क्लिनिकचे उद्घाटन

**पनवेल :** भारतात सर्वच वयोगटांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने विशेष 'ओबेसिटी क्लिनिक'ची सुरुवात केली आहे. जास्त वजन, प्रीडायबेटीस, टाइप २ मधुमेह, बैठी जीवनशैली, ताणतणाव तसेच उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि हार्मोनल असंतुलन यांसारख्या आरोग्य समस्यांनी त्रस्त रुग्णांना या क्लिनिकच्या माध्यमातून उपचार घेता येणार आहे. उद्घाटनाला डॉ. कीर्ती समुद्र (वरिष्ठ सल्लागार, एम.डी. (वैद्यकशास्त्र) व मधुमेह तज्ज्ञ) यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. प्रशांत गायकवाड (मेडिकव्हर हॉस्पिटलचे एंडोक्राइनोलॉजिस्ट) म्हणाले, लठ्ठपणा आणि टाइप २ मधुमेह यांचा परस्पर संबंध असून ते वर्षानुवर्षे हळूहळू विकसित होत जातात. या केवळ जीवनशैलीच्या समस्या नाहीत तर याचा परिणाम हृदय, मूत्रपिंड, मज्जासंस्था आणि एकूणच जीवनाच्या गुणवत्तेवर होतो.

## माघी गणेशोत्सवानिमित्त आज शिवाजीनगरमध्ये धार्मिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माघी गणेशोत्सवानिमित्त गुरुवारी (दि.२२) शिवाजीनगर श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज मंदिर येथे सकाळी ९ वाजता प्रवचन, संगीत भजन कार्यक्रम श्री गिरिमल्लेश्वर महाराज यांची पुण्यतिथी तसेच श्री गणेश जयंतीनिमित्त दुपारी १२वाजता माऊलींवर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गुरुबंधु भगिनींनी उपस्थित राहावे तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवसागर साधक समाज इंचगिरी सांप्रदाय न्हावे, न्हावेखाडी, गव्हाण, कोपर, शिवाजीनगर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि ठाकूर परिवार, ग्रामस्थ मंडळ शिवाजी नगर यांनी केले आहे.

# आदर्श पतसंस्थेने ओलांडला एक हजार कोटी एकत्रित व्यवसायाचा टप्पा

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग या संस्थेने एक हजार कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. एक हजार कोटी रूपयांचा पल्ला गाठणारी आदर्श ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी बुधवारी (दि.२१) पत्रकार परिषदेत दिली.

आदर्श पतसंस्था बँकींग क्षेत्रात आता अर्बन बँकांप्रमाणे काम करत आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना १९९८ रोजी झाली. अवघ्या २७ वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यात १००३ कोटी रूपयांचा व्यवसाय पूर्ण केला आहे. ठेवी रु. ५५८ कोटींच्या असून रु. ४४५ कोटीं रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षापर्यंत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने रु. ७५२ कोटी ७७ लाख रूपयांचा एकत्रित व्यवसाय केला होता. मार्च २०२६ पर्यंत रु. १०००




कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय करण्याचे आम्ही उद्दीष्ट ठेवले होते, परंतु सभासदांनी संस्थेवर अतूट विश्वास दाखवला म्हणून दहा महिन्यात आम्ही २५० कोटी रूपयांचा एकत्रीत व्यवसाय केला. आज आदर्शचा एकत्रीत व्यवसाय १००३ कोटी रूपयांचा झाला आहे. संस्थेचा रु. १००३ कोटी रुपयांपेक्षा जास्त एकत्रित व्यवसाय असूनही ग्रॉस एनपीए प्रमाण १ टक्क्यापेक्षा कमी असलेली आदर्श ही राज्यात अग्रगण्य पतसंस्था आहे.

आदर्शचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, मुंबई या जिल्हांमध्ये कार्यक्षेत्र आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या एकूण २२ शाखा आहेत. एक स्वतंत्र गोल्ड शाखा सुरू केली. दोन शाखा पुण्यात आहेत. पुण्यातील एक पतसंस्थेचे विलीनीकरण केले. या सर्व शाखा नफ्यात आहेत. सर्व शाखांच्या व्यवसायात वाढ झाली आहे. त्यामुळे आम्ही १००३ कोटी रूपयांचा व्यवसायाचा टप्पा गाठू शकलो. भविष्यात राज्यातील पहिल्या पाच पतसंस्थामध्ये आदर्शला नेण्याचे आमचे उद्दीष्ट आहे, असे संस्थापक सुरेश पाटील यांनी सांगितले.

कर्ज वसूली करताना कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. आदर्श परिवारातील प्रत्येक कर्मचार्याने स्वतः ला झोकून देऊन काम केले. त्यांची मेहनत, संस्थांपकांची इच्छाशक्ती यामुळे हा पल्ला गाठता आला. आदर्श पतसंस्था वित्तीयदृष्ट्या सुदृढ आणि सुव्यवस्थापित (एफएसडब्ल्यूएम) आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत आदर्शचा ग्रॉस एनपीए एक टक्क्यापेक्षा कमी ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे आदर्शचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितले.

सर्व शाखांमधील कर्मचाऱ्यांनी प्रामणिकपणे काम केले. ठेवी जमा केल्या, चांगली कर्ज वसूली केली. सभासदांना चांगली सेवा दिली, ग्राहकांचा विश्वास संपादीत केला. त्यामुळे पतसंस्थाबाबत अविश्वासाचे वातावरण असताना आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेवर मात्र ग्राहकांचा विश्वास वाढतच आहे. आदर्शच्या व्यवसायात झपाट्याने वाढ होत आहे, असे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील म्हणाले.

# आंतरराष्ट्रीय पत्रकारांचा जेएनपीएत दौरा

**उरण : वार्ताहर**

भारताच्या सर्वात मोठ्या कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने मंगळवारी (दि.२०) परराष्ट्र मंत्रालय यांच्या वतीने आयोजित परिचय दौऱ्याअंतर्गत २६ देशांतील २७ आंतरराष्ट्रीय पत्रकार प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाचे स्वागत केले.

या भेटीदरम्यान पत्रकारांना भारताच्या सर्वात मोठ्या कंटेनर बंदराची कार्यपद्धती तसेच जागतिक व्यापार सुलभ करण्यात जनेप प्राधिकरणाची महत्त्वपूर्ण भूमिका यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचा भाग म्हणून शिष्टमंडळाला जनेप प्राधिकरणातील डीपी वर्ल्ड द्वारे संचालित एका कंटेनर टर्मिनलला मार्गदर्शित भेट देण्यात आली, जिथे त्यांनी प्रत्यक्ष कार्गो हाताळणी प्रक्रिया तसेच प्रगत यांत्रिकीकरण आणि डिजिटल प्रणालींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यानंतर जनेप प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी सखोल संवाद साधण्यात आला, ज्यामध्ये पोर्ट-आधारित विकास, व्यवसाय सुलभता आणि भारताच्या वाढत्या सागरी क्षमतेवर चर्चा झाली.

या वेळी जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष, गौरव दयाल म्हणाले की, जनेप प्राधिकरण हे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापार आणि सहकार्याचे एक महत्त्वपूर्ण प्रवेशद्वार राहिले आहे. आंतरराष्ट्रीय पत्रकार प्रतिनिधींच्या या भेटीमुळे भारताची प्रगत बंदर क्षमता, कार्यक्षम कार्गो हाताळणी प्रणाली आणि जागतिक लॉजिस्टिक्समधील भारताची वाढती भूमिका अधोरेखित करण्याची संधी आम्हाला मिळाली.



# सुधागडातील शिवसैनिक भाजपत

## ◆ सेना जिल्हा संपर्क प्रमुख, तालुकाध्यक्षांच्या हाती ‘कमळ’

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशातच सुधागडच्या राजकारणाची समीकरणे पलटून गेली आहेत.ऐन निवडणुकीत सुधागडात शिंदे शिवसेनेला मोठा हादरा बसला आहे.



उन्हेरे येथे पार पडलेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात युवा सक्षम नेतृत्व शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख, व सुधागड तालुकाप्रमुख रवींद्र देशमुख हे सरपंच, उपसरपंच, सदस्य व शेकडो कार्यकर्त्यांसह दि.(२१) बुधवारी भाजपात दाखल झाले आहेत. या सर्व प्रवेश कर्त्यांचे भाजप जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील व प्रकाशभाऊ देसाई यांनी पक्षात जोरदार स्वागत केले आहे. सुधागड तालुक्यात पेणच्या ॲड निलीमाताई पाटील यांना जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर

सुधागड सन्मान समितीच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीला एकाकी पाडण्याचा प्रयत्न सर्व राजकीय पक्ष व नेतेगणांनी एकत्रित येऊन केला होता. मात्र हा निर्धार काही क्षणांचा असल्याचे चित्र पहावयास मिळाले. रवींद्र देशमुख व मिलिंद देशमुख या बड्या नेत्यांच्या पक्ष प्रवेशाने पुन्हा एकदा सुधागड तालुक्यात भारतीय जनता पार्टीला संघटनात्मक दृष्ट्या बळकटी मिळाली आहे, तर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप ला पोषक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येतंय. सुधागडात भाजपचा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व जागा जिंकण्याचा निर्धार असून त्या दृष्टीने पक्षाच्या नेते पदाधिकारी यांनी ताकत लावली आहे.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की सुधागड तालुक्यात भविष्याच्या काळात विकासाचा वेग अतिशय गतिमान असणार आहे. पनवेल नंतर पेण पेक्षा सुधागडाचा विकास झपाट्याने होईल. अशावेळी स्थानिक जनतेचा विकास होण्यासाठी सर्वांनी एक होणं गरजेचं होतं, आज सर्व ताकत एकत्र आल्याने कोणतीही अडचण येणार नाही. ज्या पक्षाची ताकत मोठी त्याच्यासमोर जनतेला नमाव लागत, आणि जनता आपल्या सोबत असेल तर भारतीय जनता पार्टीला देखील जनतेकडे त्या नजरेने त्या आदराने बघावे लागेल. सुधागड व पेणची एक नाळ जोडली असून माझं नात सुधागड तालुक्याशी घट्ट जुळलं आहे. माणस एकत्र आली मत वाढली यापेक्षा माणस माणसाला जोडली याचा आंनद मनापासून जास्त आहे असे धैर्यशील पाटील म्हणाले. रवींद्र देशमुख व मिलिंद देशमुख यांनी कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता केवळ विकासाच्या मुद्यावर भाजपात प्रवेश केला आहे, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. यापुढे भविष्यात सर्व मंडळीने एकदिलाने , एकमताने व जोमाने पक्षवाढ व जनतेच्या हितासाठी कामाला लागावे असे आवाहन खासदार पाटील यांनी केले.

यावेळी भाजप नेते प्रकाश देसाई म्हणाले की भारतीय जनता पार्टी सुधागड तालुक्यात एखाद्या वटवृक्षाप्रमाणे वाढत होती. अशातच रवींद्र देशमुख व मिलिंद देशमुख यांच्यासारख्या दोन बलाढ्य शक्ती भाजपात आल्या. त्यामुळे पक्षाची ताकत दुपटीने वाढली आहे. आपण ज्या विश्वासाने पक्षात आलात, तो विश्वास कायम सार्थकी ठरविला जाईल. आजपासून आपण एकसंघ राहून काम करूया, जे खऱ्या अर्थाने पक्षात झोकून देऊन निष्ठेने काम करतील त्यांना पक्षात कायम सन्मान, प्रतिष्ठा व न्याय मिळेल, येत्या काळात मिलिंददादा देशमुख व रवींद्र देशमुख हे सन्मानाच्या पदावर विराजमान झालेले दिसतील. मधल्या काळात आम्ही कौरव पांडव विभक्त झालो होतो, मात्र आता सर्व पांडव एकत्रित आलो आहोत. भविष्यात एकत्र राहून सुधागडच्या विकासाचा ध्यास घेऊया, खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम सुधागड घडवूया, येत्या निवडणुकीत आपण एकहाती सत्ता सहज आणू शकतो, एवढी बलाढ्य ताकत निर्माण होऊन भारतीय जनता पार्टीच सुधागड तालुक्यात शिल्लक राहिली असल्याचा दावा प्रकाशभाऊ देसाई यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रवेशकर्ते मिलिंद देशमुख व रवींद्र देशमुख म्हणाले की आम्ही खासदार धैर्यशील पाटील व आमदार रवींद्र पाटील यांच्या विकास कार्यावर प्रभावित होऊन आम्ही सर्वांनी सुधागडच्या विकासासाठी सत्तेतील भाजपा पक्षात प्रवेश केला. इतर आमदार आपापल्या मतदार संघाचा विकास बघतात, मात्र आमच्या तालुक्याचे आमदार खासदार सुधागड तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास घडवून आणतील असा विश्वास आम्हाला आहे. आता सुधागडातील जिल्हा परिषद व पंचायत समिती त आम्ही एकत्रितपणे आमचा करिष्मा दाखवू असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केला.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, सतीश देसाई, अशोक कांबळे, यशवंत पालवे, रवींद्र देशमुख, मिलिंद देशमुख, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, पाली नगराध्यक्ष पराग मेहता, विठ्ठल सिंदकर,आलाप मेहता, आरिफ मणियार , मनोहर नाना देशमुख, प्रणाली शेठ, माजी तालुका अध्यक्ष हिराकांत भगत, प्रकाश ठोंबरे, अजय खंडागळे, माजी तालुका अध्यक्ष किशोर जोशी,मनोहर देशमुख उपस्थित होते.

## जमीन मोजणीदरम्यान कर्मचाऱ्यावर हल्ला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव ब्रिजच्या कामासाठी सुरू असलेल्या जमीन मोजणीदरम्यान ठेकेदाराच्या कर्मचारी याच्यावर थेट हल्ला झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २०) चौल येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून एका आरोपीला अटक करण्यात आली असून, सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे.

दि. २० जानेवारी रोजी सकाळी साडेदहा ते पावणे अकराच्या सुमारास चौल येथील रामेश्वर राईस मिलच्या पाठीमागील मोकळ्या जागेत रेवदंडा–साळाव ब्रिजसाठी आवश्यक असलेल्या जमीन मोजणीचे काम सुरू होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून नियुक्त रोडिक कन्सलटंट प्रा. लि. (नवी दिल्ली) या कंपनीत कार्यरत अभियंता सुरेंद्र चंद्रभान सिंग (वय ३३) हे कामावर देखरेख करत होते.

याच दरम्यान आरोपी मोहसीन अहमद तांडेल व मुफेज मोहसीन तांडेल (दोघे रा. रेवदंडा) हे घटनास्थळी आले. आपल्या जागेत का आलात? या कारणावरून त्यांनी वाद घातला. वादाचे रूपांतर थेट हल्ल्यात झाले.आरोपी क्र. २ ने अभियंत्यावर लाकडी पट्टीने मारहाण केली,तर दोघांनी मिळून शिवीगाळ, दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या घटनेनंतर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी मुफेज मोहसीन तांडेल याला सायंकाळी ७ वाजता अटक केली आहे.इतर आरोपीविरोधातही पुढील तपास सुरू आहे

## गटारावर स्लॅब टाकण्याची मागणी

**खोपोली :** मुंबई पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील शिळफाटा इंदिरा गांधी चौकातील रिक्षा स्टॅन्ड जवळील संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित विभागाने तेथील ओपन गटारावर स्लॅब टाकण्यात यावा अशी रिक्षा संघटनेतर्फे मागणी करण्यात येत आहे. मुंबई पुणे जुन्या महामार्गावर शिळफाटा चौकात मोठ्या प्रमाणात रहदारी असते, काही वर्षांपूर्वी या चौकात भीषण अपघात झाला होता व त्यात अनेकांचे जीव गेले होते.

## पोलादपूर तालुक्यात चार पं.स.गणातील २४ तर दोन जि.प. गटातील ११ नामनिर्देशन पत्र दाखल



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीच्या चार गणांसाठी २४ तर जिल्हा परिषदेच्या दोन गटांसाठी ११ नामनिर्देशनपत्र दाखल झाली असून राष्ट्रवादी, राकाँ.शप, भाजप, शिवसेना, शेकाप, काँग्रेस, मनसे, उबाठा, जनता दल सेक्युलरचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मंगळवारी सहा उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर बुधवारी २९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले

लोहारे ५९ जि.प. सर्वसाधारण गटामध्ये चंद्रकांत कळंबे (शिवसेना), कृष्णा कदम (भाजपा), मुरलीधर दरेकर (शिवसेना उबाठा), एकनाथ गायकवाड (शेकाप), रझाक करबेलकर (काँग्रेस), वैभव चांदे (भाजपा), सतीष शिंदे (शिवसेना), अशा एकूण आठ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केली आहेत.

कापडे बुद्रुक गटामध्ये डॉ.निलेश कुंभार (शिवसेना), अजय सलागरे (राष्ट्रवादी–भाजपा) आणि असे एकूण तीन उमेदवार रिंगणात आहेत.

माटवण पंचायत समिती गणामध्ये शिवसेनेने उमेदवारी अर्ज दाखल केला नसून शेकापतर्फे सुनीता पवार, साक्षी कांबळेकर, राष्ट्रवादीतर्फे मीनाक्षी सुतार, राकाँशप पक्षातर्फे हर्षदा वरवाटकर असे एकूण चार उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले.

कापडे बुद्रुक सर्वसाधारण गणामध्ये शिवसेनेतर्फे अनिल दळवी आणि प्रकाश कदम, राष्ट्रवादीतर्फे अनिल मालुसरे, शेकापतर्फे मनोहर पार्टे, शिवसेना उबाठाचे पांडुरंग सोंडकर, जनतादल सेक्युलरचे भगवान साळवी, असे एकूण ८ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले.

लोहारे गणामध्ये शिवसेनेतर्फे अनिता भिलारे, मनसेतर्फे शितल तुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे युगज्ञा दरेकर अशा पाच उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत.

कोतवाल बुद्रुक गणामध्ये शिवसेनेतर्फे अविनाश शिंदे आणि सतीश शिंदे, शिवसेना उबाठातर्फे गणेश दरेकर,भाजपतर्फे सुरेंद्र चव्हाण, शेकापतर्फे बापू जाधव, सौरभ चिकणे, असे एकूण ७ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी शिवसेना शेकापक्ष, मनसे उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस भाजप आणि राकाँशप, अशा राजकीय युती आघाडया होणार असून काँग्रेस आणि जनता दल सेक्युलरचे प्रत्येकी एक उमेदवार स्वतंत्र निवडणुक लढतील

## जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भगवा फडकवा; आमदार महेंद्र दळवी यांचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात विकासकामांची गती वाढली आहे.जनतेला अपेक्षित विकासकामे करीत आहेत. प्रत्येक गावातील रस्ते, पाणी यासह विविध मूलभूत विकासाची कामे मार्गी लागत आहे. मी आमदार झाल्या पासून कित्येक कामे पूर्णत्वास गेली आहेत. तसेच काही कामे प्रस्तावित आहेत. ती पूर्ण येत्या काही दिवसांत पूर्ण होतील. विकासाची घोडदौड कायम राहण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा फडकविणे आवश्यक आहे. त्यामुळे आजच प्रत्येक कार्यकर्त्याने भगवा फडविण्यासाठी निर्धार करून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा फडकला पाहिजे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन शिवसेनेचे अलिबाग मुरुड रोहा मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी मुरूड समुद्रकिनारी राजपुरी व कोर्लई जिल्हा परिषद गट ,राजपुरी , नांदगाव,बोर्ली,व कोर्लई पंचायत समिती गण उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेवेळी बोलत होते.

यावेळी शिवसेना पक्षाचे निवडणूक निरीक्षकभाई खांडे,महिला जिल्हा प्रमुख तृप्ती पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे,युवा उपजिल्हा प्रमुख दिपेश वरणकर, शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम अध्यक्ष दिनेश मिनमिने,अमोल लाड,मंदा म्हात्रे,माजी नगराध्यक्ष–स्नेहा पाटील, नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, यशवंत पाटील,मनोज कमाने, श्रीकांत सुर्वे, ऋतुजा वरणकर,जिविता मिनमिने,रमेश नागावकर,निर्मला म्हात्रे,सी.एम.ठाकुर,युगा ठाकुर,भगीरथ पाटील,अजगर दळवी उपस्थित होते.

यावेळी जनतेनी ही निवडणूक हातात घ्यावी आणि कामाची पोच पावती म्हणून माझ्या शिलेदारांना निवडुन आणावे अशी विनंती यावेळी आमदार यांनी केली.



### मुरुड जि.प. पं.स उमेदवार

- उमेदवार बोर्ली पंचायत समिती गण निलेश घाटवल,
- कोर्लई पंचायत समिती गण –स्वाती चवरकर,
- नांदगाव पंचायत समिती गण– गणेश नात्ती,
- राजपुरी जिल्हा परिषद गट – विघ्नेश माळी,
  कोर्लई जिल्हा परिषद गट – ज्योती नागावकर,
  शशांक कासार


ॲड. आशा अरुणकुमार भगत
मो. ८१०८३५५०००

### जाहीर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ अर्ज क्र. १०/२०२६
निशाणी क्रमांक
नि.८/ड
ने.ता. १२/०२/२०२६

१. श्री दिगंबर यशवंत पाटील
रा. एच/५५१ सुर्यकुंड को हो सो
महापुरुष मंदीर मार्ग माझगांव गन पावडर रोड
मुंबई महाराष्ट्र ४०००१०
२. श्रीमती स्नेहलता यशवंत पाटील उर्फ
श्रीमती स्नेहलता जनार्दन गोवारी
रा.द्वारा जनार्दन शनिवार गोवारी
घर कमांक २५९ कामोठे गाव तालुका पनवेल जि रायगड ४१०२०६
३. सौ आशा यशवंत पाटील उर्फ
सौ. आशा अरुणकुमार भगत
रा.घर क्रमांक ३१९ जुई कामोठे गाव कळबोली नोड ता. पनवेल
जि. रायगड ४१०२१८
४. श्री. संदीप यशवंत पाटील
रा. एच/५५२ सुर्यकुंड को ही सो
महापुरुष मंदीर मार्ग माझगांव गन पावडर रोड
मुंबई महाराष्ट्र ४०००१०

अर्जदार कमांक १ ते ४ यांचे वडिल कै यशवंत धर्मा पाटील हे दिनांक १७/०७/२०२४ रोजी मयत झाले त्यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै यशवंत धर्मा पाटील यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत सदरहु कै यशवंत धर्मा पाटील यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असणा–या खालील वर्णनाचा भुखंड होता व त्याचे वर्णन येणेप्रमाणे :–

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे–नवघर, ता. उरण, जि. रायगड**

| युनिट केस क्र | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| ३६० | १५३ | १ | ०–१०–४ | १.०६ |
| ३६० | १५३ | ४ | ०–९–१२ | १.२५ |
| ३६० | १५६ | ३ | ०–१६–४ | २.३१ |

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितराम्बंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मेंः न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात बईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माड़ी सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिलेली आहे.

सही/–
क. लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

शिक्का

सही/–
सह. अधीक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण


## मुगवली येथील श्री स्वयंभू गणपती मंदिराचा ‘श्री जन्मोत्सव’

**माणगाव : प्रतिनिधी**

’श्री जन्मोत्सव व माघी गणेशोत्सव’ हा कोकणात दरवर्षी साजरा केला जातो. यावेळी विविध कार्यक्रम, जत्रोत्सव व जल्लोषामय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कोकणात अनेक गणपती देवस्थाने आहेत. त्यातील एक ’स्वयंभू गणपती मंदिर मुगवली’ हे आहे.



माणगांव तालुक्यातील मुंबई गोवा हायवेलगत मुगवली येथेअसलेल्या स्वयंभू गणपती मंदिरात श्री जन्मोत्सव गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार असून दरवर्षी प्रमाणे या वेळी तिथे यात्रा देखील मोठया प्रमाणावर भरते येथे दरवर्षी विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे व यात्रेचे आयोजन विश्वस्त व ग्रामस्थ मंडळाकडून करण्यात येते. सकाळी ७ ते ११ श्री मूर्ती महापुजा सोहळा, ११ वा. गणेश जन्म उत्सव किर्तन, १२.३९ वा. गणेश जन्म , १ वा. भजन , २ वा. श्री गणेश यागारंभ, ७.३० यागपूर्णहुती, रात्री १२.३० वा महानेवैद्य, महाआरती व प्रसाद असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. भक्तिमय वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने हा उत्सव साजरा करण्यात येतो.

नवसाला पावणारा मूगवलीचा श्री स्वयंभू गणपती.मराठी मनाचे गणेश हे लाडके दैवत आहे, त्या गणेशाची पुजाअर्चा करूनच शुभकामाला सुरूवात केली जाते. कोकणात या गणेशोत्सव काळात भक्तीला उधाणच येते. गजाननाची अनेक रुपे आहेत. त्यापैकीच एक असलेल्या माणगाव जवळील मुगलीच्या गणपतीचे स्थान हे जागृतम्हणून परिचीत आहे. शिवाय भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती म्हणूनही त्याची सर्वत्र ख्याती आहे. रायगड जिल्हातील मुंबई–गोवा महामार्गावर माणगावपासून ३ कि. मी. अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दिड किमी अंतरावर हे स्वयंभू गणेश मंदिर आहे. मुगवली हे शंभर ते सव्वाशे घरांचे छोटे गाव आहे. गाव जरी छोटे असले, तर या गणपतीमुळे त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे.

सुमारे ३२५ वर्षापूर्वी मुगवलीच्या परिसरातील एका शेतात एक शेतकरी नांगरणी करीत होता. अचानक शेतातील एका दगडास नांगराचा फाळ लागून तेथून रक्त येऊ लागले. हे पाहून त्या शेतकऱ्याने गावाकडे धाव घेऊन घडलेली सर्व हकीकत गावकऱ्यांना सांगितली. सर्व ग्रामस्थांनी याबाबत गोरेगावच्या जाणकारांचा सल्ला घेतला व हे गणेशाचे स्वयंभू महास्थान आहे, असे त्यांनी सांगितल्यावर ग्रामस्थांनी त्या पाषाणाभोवतालची जागा स्वच्छ केली. त्यानंतर सर्वांनाच नैसर्गिक अवस्थेतील गणेशाचे मोहक दर्शन झाले. ही मूर्ती जमिनीतून वर आलेल्या दोन फूट लांबी–रुंदीच्या पाषाणावर नैसर्गिक अवस्थेत असून, मस्तक, उभी वळलेली सोंड, पोट अशा स्वरुपाची आहे. मागील बाजूस सिंह असून, त्यास पाठ टेकून खाली पाय सोडून तो बसलेला आहे. गणेशाचे नेत्र नैसर्गिक अवस्थेत असल्यामुळे त्याचे डोळे बोलके वाटतात. सर्व ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी सुरूवातीस एक कुडाचे मंदिर उभारले. त्यानंतर प्राचीन काळातील या मंदिराचा ३५ वर्षापूर्वी जीर्णोद्धार करून गाभाऱ्यात संगमरवरी दगड बसविण्यात आला व मंदिरही थोडे प्रशस्त करण्यात आले.

१९६८ साली मुगवलीच्या स्थानिक स्वयंभू गणेश मंडळाने गणेश व्यवस्थापन समिती स्थापन करून श्रींच्या भोवती उत्तमपैकी छोटासा गाभारा बांधला आणि दररोजच्या गणेशपुजेची व्यवस्था केली. पूर्वीच्या जुन्या कौलारू मंदिराचे रुपांतर आता भव्य अशा सिमेंट काँक्रीटच्या २२ फूट रुंद व ३० फूट लांब अशा सुंदर मंदिरात झाले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com


"हे यश तुमचं आहे."
1003+ कोटी
ठेवी 558
कर्ज 445
आदर्श पतसंस्था, अलिबाग
हा प्रवास आकड्यांचा नाही,
हा हजारो कुटुंबांचा, महिला, शेतकरी, युवक,
व्यापारी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या
विश्वासाचा प्रवास आहे.
आपण विश्वास ठेवला... आणि आम्ही तो जपला!
आदर्श एक विश्वास...!
आमचे प्रेरणास्थान
श्री. सुरेश पाटील, संस्थापक
आदर्श पतसंस्था अलिबाग
आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार.
श्री. अभिजित पाटील अध्यक्ष
श्री. कैलास जगे उपाध्यक्ष
सौ. मीनाक्षी पाटील सी.ई.ओ.
संचालक मंडळ व सर्व कर्मचारी वृंद
ग्राहक सेवा क्रमांक : 9112305888/9112306888
adarshapatsanstha
www.adarshapatsanstha.com
स्कॅन करा आणि आदर्श परिवारामध्ये सहभागी व्हा.